रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक २५८
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ मंगळवार, ७ एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

रायगडात 'बेटी बचाव बेटी पढाव'चा नारा/२
वेठबिगारीच्या जोखडातून मुलांची मुक्तता/५
बेलापूरमध्ये क्रिकेट प्रीमियर लीग रंगली/८

## राज्यसभेत १९ नवीन खासदारांचा शपथविधी



**नवी दिल्ली** : राज्यसभेत सोमवारी (दि.६) महाराष्ट्रातील सात नेत्यांसह एकूण १९ नवनिर्वाचित खासदारांनी राज्यसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. या नवनिर्वाचित सदस्यांना राज्यसभा अध्यक्ष सी.पी. राधाकृष्णन यांनी शपथ दिली. महाराष्ट्रामध्ये राज्यसभेच्या सर्व सात जागांवरील उमेदवार बिनविरोध निवडून आले होते. यामध्ये महायुतीचे सहा, तर महाविकास आघाडीच्या एका उमेदवाराचा समावेश होता. केंद्रीय मंत्री तथा रिपाइंचे अध्यक्ष रामदास आठवले आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार हे दोघे सलग तिसऱ्यांदा राज्यसभेवर गेले आहेत. याशिवाय भाजपचे राष्ट्रीय सचिव विनोद तावडे, रामराव वडकुते, माया इवनाते; एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या ज्योती वाघमारे आणि माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र व राष्ट्रवादीचे नेते पार्थ पवार यांनीही यावेळी खासदारकीची शपथ घेतली.

# भाजपचे जनकल्याणाला प्राधान्य

### पंतप्रधान मोदींचे उद्गार; पक्ष स्थापना दिनानिमित्त दिल्या शुभेच्छा

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचा ४७वा स्थापना दिन सोमवारी (दि.६) उत्साहात साजरा झाला. यानिमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक वरिष्ठ नेत्यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांना शुभेच्छा देत त्यांच्या समर्पणभावना आणि राष्ट्रसेवेच्या कार्याचा गौरव केला.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या संदेशात म्हटले की, भाजपने नेहमीच 'इंडिया फर्स्ट' या तत्त्वावर काम करत समाजसेवेत अग्रणी भूमिका बजावली आहे. त्यांनी कार्यकर्त्यांच्या निःस्वार्थ सेवाभाव, अथक परिश्रम आणि सुशासनासाठीच्या बांधिलकीचे कौतुक केले. अनेक दशकांपासून असंख्य कार्यकर्त्यांच्या त्याग, सेवा आणि दृढ संकल्पामुळे पक्ष अधिक मजबूत झाला असल्याचे त्यांनी नमूद केले. जनकल्याणाला केंद्रस्थानी ठेवून काम करण्याची पक्षाची परंपरा आजही कायम असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही 'नेशन फर्स्ट, पार्टी नेक्स्ट, सेल्फ लास्ट' या मंत्राचा पुनरूच्चार करत कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या. सीमा व अंतर्गत सुरक्षा मजबूत करणे, विकासाचे नवे मानदंड निर्माण करणे आणि भारतीय संस्कृतीचे जतन करणे या क्षेत्रांत भाजपने उल्लेखनीय कार्य केले असल्याचे त्यांनी सांगितले तसेच ऋषी दधीची यांच्या त्यागातून प्रेरणा घेऊन राष्ट्रहित सर्वोच्च मानण्याचा संदेश त्यांनी दिला.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पदापेक्षा पक्षाच्या माध्यमातून राष्ट्रसेवेला महत्त्व देणाऱ्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना भाजप स्थापना दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

दरम्यान, भाजपच्या स्थापना दिनानिमित्त देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पहायला मिळाले.

## पनवेलमध्ये भाजपचा स्थापना दिन उत्साहात साजरा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जगातील सर्वात जास्त सदस्य असलेल्या भारतीय जनता पक्षाचा स्थापना दिवस सोमवारी (दि. ६) पक्षाच्या पनवेल तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयात मोठ्या उत्साहात आणि अभिमानाने साजरा करण्यात आला. १९८० साली स्थापन झालेल्या या पक्षाने गेल्या अनेक दशकांत देशाच्या सर्वांगीण विकासासाठी, सुशासनासाठी आणि जनकल्याणासाठी सातत्याने कार्य केले आहे.

कार्यक्रमाची सुरुवात पक्षाच्या ध्वजारोहणाने करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला तसेच पक्षाच्या संस्थापकांचे आणि देशसेवेसाठी योगदान देणाऱ्या नेत्यांचे स्मरण करून अभिवादन केले. यावेळी कार्यकर्त्यांनी पक्षाच्या विचारसरणीप्रती निष्ठा राखण्याचा आणि समाजसेवेचा संकल्प पुन्हा दृढ केला. एकमेकांना पेढे वाटून स्थापना दिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेलचे महापौर नितीन पाटील, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, जिल्हा सरचिटणीस चारुशिला घरत यांनी आपल्या भाषणात भाजपच्या प्रवासाचा आढावा घेतला आणि पक्षाने देशाच्या विकासात बजावलेली भूमिका अधोरेखित केली. भाजपचा स्थापना दिवस हा केवळ एक औपचारिक सोहळा नसून कार्यकर्त्यांसाठी प्रेरणा, निष्ठा आणि सेवा भावनेचा नवा संकल्प करण्याचा दिवस आहे. त्यामुळे त्यांनी कार्यकर्त्यांना आगामी काळात अधिक जोमाने कार्य करण्याचे, संघटन बळकट करण्याचे आणि शासनाच्या योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहचवण्याचे आवाहन केले तसेच प्रितम म्हात्रे यांनी आजपासून सात दिवस रोजगार सप्ताह आयोजित करण्यात आल्याचे सांगून या माध्यमातून तरुणांना रोजगाराची संधी दिली जाणार असल्याचे सांगितले. **(पान २ वर..)**

## बारामती हा दादांचा श्वास होता -उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

### पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल



**बारामती : प्रतिनिधी**

बारामती विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीसाठी महायुतीच्या उमेदवार उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सोमवारी (दि. ६) आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करण्यापूर्वी आयोजित सभेत सुनेत्रा पवार यांनी स्व. अजित पवार यांच्या स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

अर्ज दाखल करतेवेळी शिवसेनेचे प्रमुख उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजप नेते मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, मंत्री छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, नरहरी झिरवळ, दत्तात्रय भरणे, आदिती तटकरे, विधानसभेचे उपसभापती अण्णा बनसोडे, माजी मंत्री धनंजय मुंडे, खासदार पार्थ पवार, आमदार सरोज अहिर, सना मलिक, जय पवार आदी उपस्थित होते.

तत्पूर्वी झालेल्या राष्ट्रवादीच्या मेळाव्यात अजितदादांच्या आठवणीने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. भावूक होत त्या म्हणाल्या की, बारामती हा दादांचा श्वास होता. त्यामुळे त्यांचा अखेरचा श्वासही याच मातीत राहिला. दादांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आणि बारामतीचा विकास करण्यासाठी मी माझे दुःख तळघरात कोंडून अत्यंत धीराने आपल्या सर्वांसाठी बाहेर पडले. हा धीर बारामतीकरांकडे बघूनच आला आहे. तुमचे प्रेम, पाठिंबा आणि साथ हीच माझी शक्ती आहे.

गेल्या ३५-३६ वर्षांत अजितदादांना बारामतीकरांनी प्रचंड मताधिक्याने निवडून दिले. आताची ही पोटनिवडणूक दादांना श्रद्धांजली अर्पण करण्याची संधी आहे. बारामतीसह राज्यातील जनतेचीही काळजी घेण्याची शक्ती मला मिळावी, असे आवाहन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केले.

## राहुरी पोटनिवडणुकीसाठी अक्षय कर्डिलेंनी भरला अर्ज



**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी दिवंगत आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे पुत्र अक्षय कर्डिले यांनी भाजप महायुतीच्या वतीने आपला उमेदवारी अर्ज सोमवारी (दि.६) दाखल केला. या पार्श्वभूमीवर विजयी निर्धार मेळावा पार पडला. यावेळी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

याशिवाय विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, आमदार मोनिका राजळे, संग्राम जगताप, विठ्ठलराव लंके, अमोल खताळ, काशिनाथ दाते, सुरेश धस, भाजयुमोचे प्रदेश अध्यक्ष कृष्णराज महाडिक, महापौर ज्योती गाढे, माजी मंत्री बबनराव पाचपुते, सुभाष पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निवडक

### भारताच्या आठव्या जहाजाने होर्मुझ सामुद्रधुनी केली पार

**तेहराण** : भारताचे आठवे जहाज 'ग्रीन आशा'ने होर्मुझ सामुद्रधुनी यशस्वीरित्या पार केली आहे. भारतीय वेळेनुसार रविवारी दुपारी ३.३० वाजता हे जहाज इराणच्या लारक, केशम आणि होर्मुझ बेटांदरम्यान असलेल्या जलक्षेत्रातून मार्गक्रमण करून सामुद्रधुनीच्या पूर्व भागात पोहचले होते. २८ फेब्रुवारीला युद्ध सुरू झाल्यानंतर एलपीजी वाहून नेणारे होर्मुझ सामुद्रधुनी पार करणारे हे आठवे भारतीय जहाज ठरले आहे.

### रनआऊट दिले म्हणून थेट अंपायरची केली हत्या

**विशाखापट्टणम** : येथे स्थानिक क्रिकेट सामन्यात अंपायरची निर्घृण हत्या करण्यात आली. डोला अजित बाबू (वय २१) असे त्याचे नाव असून कांता किशोर नावाच्या प्रेक्षकाने अंपायर आणि खेळाडूंशी वाद घालत शिवीगाळ केली. त्यानंतर चाकू हल्ला केला. यात अंपायरचा मृत्यू झाला असून चिरंजीवी गंभीर जखमी झाला, तर मध्यस्थी करणाऱ्या आणखी एका व्यक्तीलाही दुखापत झाली. पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## अलिबागेत लोकशाही दिनी अधिकारी गैरहजर

### माजी आमदार पंडित पाटील यांनी व्यक्त केली नाराजी



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवारी (दि.६) आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय लोकशाही दिनाला जिल्हाधिकारी यांच्यासह बहुतांश अधिकारी अनुपस्थित होते. त्यामुळे आपले गाऱ्हाणे घेऊन आलेल्या नागरिकांसह माजी आमदार पंडित पाटील यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित केला जातो. त्यानुसार ६ एप्रिल रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात आयोजित करण्यात आला होता. लोकशाही दिनास जिल्हाधिकारी यांनी उपस्थित राहून खातेप्रमुखांच्या माध्यमातून नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करणे अपेक्षित असते, पण सामान्य प्रशासन विभागाचे उपजिल्हाधिकारी डॉ. रवींद्र शेळके यांच्या उपस्थितीत लोकशाही दिनाचा सोपस्कार उरकण्यात आला. यावेळी नागरिकांच्या तक्रारी लक्षात घेऊन त्या त्या विभाग प्रमुखांना फोन करून बोलावण्याची वेळ आली.

> लोकशाही दिन हा लोकांचा हक्काचा दिवस असतो. न्याय मिळेल या अपेक्षेने लोक इथं येत असतात, पण प्रशासन आणि अधिकारी, खातेप्रमुख अशा प्रकारे गैरहजर असतात. लोकशाही दिनास गैरहजर राहणाऱ्या या अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे.
>
> **-पंडित पाटील,** माजी आमदार

या जिल्हास्तरीय लोकशाही दिनाला बहुतांश विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित नव्हते. त्यामुळे माजी आमदार पंडित पाटील यांनी प्रशासन आणि उपस्थित अधिकाऱ्यांची खरडपट्टी काढली तसेच प्रशासनाच्या हलगर्जीपणाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली.

## अशोक खरातविरोधात ईडीकडून गुन्हा दाखल

**नाशिक : प्रतिनिधी**

अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप असलेल्या अशोक खरातच्या अडचणीत आता मोठी वाढ झाली आहे. यापूर्वीच १३ गुन्हे दाखल असलेल्या खरात प्रकरणात आता सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) मनी लॉण्डरिंगचा गुन्हा दाखल केला आहे.

अशोक खरातवर केवळ बलात्काराचेच नाही, तर फसवणूक करून कोट्यवधी रुपयांची मालमत्ता जमवल्याचेही गंभीर आरोप आहेत. नाशिक पोलिसांनी दिलेल्या माहितीच्या आधारे ईडीने या आर्थिक गैरव्यवहाराच्या मुळाशी जाण्यासाठी तपास सुरू केला आहे. पोलिसांनी जमा केलेली सर्व महत्त्वाची कागदपत्रे ईडीने आपल्या ताब्यात घेतली असून खरातचे हे अफाट आर्थिक साम्राज्य नेमके कसे उभे राहिले याची कसून चौकशी केली जाणार आहे.



## पनवेलचे महापौर नितीन पाटील यांनी घेतली पोलीस आयुक्तांची भेट

### फेरीवाले, अतिक्रमण व वाहतूक कोंडीवर चर्चा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील यांनी सोमवारी (दि.६) नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान पनवेल महानगरपालिका हद्दीतील फेरीवाले व इतर अतिक्रमणे, वाढती वाहतूक कोंडी तसेच कायदा व सुव्यवस्थेशी संबंधित विविध संवेदनशील विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

शहरातील प्रमुख मार्गांवरील अनधिकृत फेरीवाल्यांमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी, वाहतुकीवरील ताण तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजनांबाबत सकारात्मक संवाद झाला.

यावेळी भाजप खारघर अध्यक्ष नगरसेवक प्रवीण पाटील आणि जिल्हा कार्यकारिणी सदस्य उमेश इनामदार उपस्थित होते. शहरातील नागरिकांना सुरक्षित, सुटसुटीत व शिस्तबद्ध वातावरण मिळावे यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

## अलिबागच्या पांढऱ्या कांद्याच्या उत्पादनात यंदा मोठी वाढ

**अलिबाग : प्रकाश सोनवडेकर**

अलिबाग तालुक्यातील पांढरा कांदा सध्या मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी आला आहे. यंदा त्याच्या लागवड क्षेत्रात १०० हेक्टरने वाढ होऊन



उत्पादनातदेखील वाढ झाली. त्यातून सुमारे १८ कोटी ९६ लाख रुपयांची आर्थिक उलाढाल झाली आहे.

दोन वर्षांपूर्वी केंद्र सरकारकडून पांढऱ्या कांद्याला भौगोलिक मानांकन मिळाल्याने त्याच्या ब्रँडिंगला मोठी चालना मिळाली आहे. त्यामुळे बाजारपेठेत अलिबागच्या या कांद्याला वेगळी ओळख निर्माण झाली असून मागणी सातत्याने वाढत आहे. अलिबाग तालुक्यात यंदा या कांद्याची लागवड ३१६ हेक्टर क्षेत्रावर करण्यात आली. विशेष म्हणजे मागील वर्षी हे क्षेत्र २२१ हेक्टर होते. तालुक्यातील नेहुली, खंडाळे, कार्ले आणि तळवली या गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर पांढऱ्या कांद्याची शेती केली जाते. सुमारे ७६५ शेतकऱ्यांनी या पिकातून उत्पादन घेतले असून सरासरी प्रति हेक्टरी १० मेट्रिक टन उत्पादन नोंदवले गेले आहे.

महानगरांमधून या कांद्याला मोठ्या प्रमाणात मागणी येत आहे. व्यापारी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर येऊन कांद्याची खरेदी करत असल्याने शेतकऱ्यांना वाहतूक आणि बाजारातील त्रास कमी झाला आहे. सध्या लहान कांद्याला १५० ते २०० रुपये प्रति माळ दर मिळत असून हंगामाच्या सुरुवातीला हा दर ३०० ते ३५० रुपये इतका होता.

> *यंदा पांढऱ्या कांद्याच्या लागवड क्षेत्रात तब्बल १०० हेक्टरने वाढ झाली आहे. तीन हजार १६० टन पांढऱ्या कांद्याचे उत्पादन झाले असून त्यातून सुमारे १८ कोटी ९६ लाख रुपयांची आर्थिक उलाढाल झाली आहे.*
>
> **-तन्मय भगत,** तालुका कृषी अधिकारी

### रायगड हॉस्पिटलमधील वैद्यकीय निष्काळजीमुळे रुग्णाच्या मृत्यूचे प्रकरण

## चार डॉक्टरांसह हॉस्पिटल व्यवस्थापन आरोपी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नेरळ पोलीस ठाणे हद्दीत घडलेल्या वैद्यकीय निष्काळजीपणाच्या प्रकरणात कर्जत तालुक्यातील डिकसळ येथील रायगड हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्चच्या चार डॉक्टरांवर गुन्हा दाखल झाल्यानंतर पुढील तपासाच्या आधारे हॉस्पिटल व्यवस्थापनाचे डॉ. नंदकुमार बादवराव तासगावकर, यादवराव हिरप्पा कांबळे, वंदना नंदकुमार तासगावकर, डॉ. शशिकांत रामचंद्र गंगावणे आणि चंद्रशेखर सीताराम सुळगावकर यांच्यावर जबाबदारी निश्चित करून या गुन्ह्यात त्यांनाही आरोपी करण्यात आले आहे.

नेरळमधील नाणिवली गावातील १६ वर्षीय रोहित गवळी याच्यावर रायगड हॉस्पिटलमध्ये करण्यात आलेल्या अपेन्डिस शस्त्रक्रियेदरम्यान भूलतज्ज्ञाकडून भूल न देता डॉक्टरांमार्फत चुकीची भूल देण्यात आली आणि शस्त्रक्रियेदरम्यान रोहितचा दुर्दैवी मृत्यू झाला, मात्र याची कल्पना त्याच्या कुटुंबाना न देता ती माहिती रुग्णालयाकडून लपवून ठेवण्यात आली होती. अत्यंत वेदनादायक अशा प्रकाराने संपूर्ण रायगड जिल्हा हळहळला होता.

मुलगा दगावल्याने वैद्यकीय हलगर्जी प्रकरणात डॉ. अमरसिंह बाबासाहेब कांबळे, डॉ. महंमद दानीश मुस्ताक अहमद, डॉ. तेजेश दत्तात्रेय हुजरे व डॉ. शिवकुमार वेलुदास यादव यांच्याविरोधात कठोर कारवाई करावी तसेच मेडिकल कौन्सिल व इतर संबंधित प्राधिकरणांकडे तक्रार दाखल करून आवश्यक ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करणारा अर्ज पालकांकडून सादर नेरळ पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आला. या संदर्भात भारतीय दंड संहिता कलम ३०४(अ) व ३४ अन्वये २ मार्च २०२४ रोजी रात्री १०.२९ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा तपास तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी ढवळे यांनी सखोलपणे करून संबंधित आरोपींविरुद्ध आवश्यक ते पुरावे संकलित केले तसेच मेडिकल कौन्सिलने संबंधित चार डॉक्टर आणि व्यवस्थापनाला दोषी ठरवले. तपासाअंती उपलब्ध झालेल्या पुराव्यांच्या आधारे वरील नमूद डॉक्टर आरोपींविरुद्ध ४ सप्टेंबर २०२५ रोजी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कर्जत यांच्या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे तसेच तपासादरम्यान संबंधित घटनेत हॉस्पिटल व्यवस्थापनाचीदेखील जबाबदारी आढळून आल्याने चेअरमन डॉ. नंदकुमार तासगावकर, सेक्रेटरी यादवराव कांबळे, जॉईंट सेक्रेटरी वंदना नंदकुमार तासगावकर, विश्वस्त डॉ. शशिकांत रामचंद्र गंगावणे आणि चंद्रशेखर सीताराम सुळगावकर यांनादेखील या गुन्ह्यात आरोपी करण्यात आले आहे. त्यांच्या विरोधात ३ एप्रिल २०२६ रोजी पूरक दोषारोपपत्र प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कर्जत यांच्या न्यायालयात सादर करण्यात आले आहे.

### माजी खासदार किरीट सोमय्या यांचा पाठपुरावा



*सर्वसामान्य रुग्णांना योग्य ते उपचार न देता रुग्णांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या आणि निष्काळजीपणाने वागणाऱ्या या रुग्णालयाच्या व्यवस्थापनालाही सहआरोपी करण्यात आले आहे. यामुळे निष्काळजी व बेजबाबदारपणा करणाऱ्यांना धडा मिळाला आहे. हे प्रकरण माजी खासदार किरीट सोमय्या यांनी काळजीपूर्वक पाठपुरावा करून मार्गस्थ लावले तसेच यापुढे जिल्ह्यात अशा प्रकारचे निष्काळजी व बेजबाबदारपणाचे प्रकरण झाले, तर संबंधितांनी भाजप कार्यकर्त्यांकडे संपर्क साधावा, असे आवाहन भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले असून न्याय मिळवून देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे नमूद केले आहे.*

# भाजपचा ४६ वर्षांचा प्रवास त्याग अन् समर्पणाचा -प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचा सोमवारी (दि.६) स्थापना दिवस होता. संपूर्ण देशासह राज्यांमध्ये पक्षातर्फे मोठ्या उत्साहात स्थापना दिवस साजरा करण्यात आला. मुंबईमध्येही मोठ्या उत्साहात भाजपचा स्थापना दिवस साजरा करण्यात आला. मुंबईतील नरीमन पॉइंट येथील प्रदेश कार्यालयात व दादर येथील केशव स्मृती कार्यालयामध्ये हा कार्यक्रम मोठ्या उत्साहामध्ये साजरा करण्यात आला.



दरम्यान, प्रदेश कार्यालयामध्ये बोलताना भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सर्व कार्यकर्त्यांना भाजपच्या स्थापना दिनाच्या शुभेच्छा दिल्या तसंच पक्षाचा प्रवास मागील ४६ वर्षांच्या त्याग आणि समर्पणाचा प्रवास असल्याचं यावेळी त्यांनी सांगितलं.

विकसित भारताचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी पक्ष कटिबद्ध : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकसित भारताचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी पक्ष कटिबद्ध आहे, असे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण म्हणाले. "मी भाजपाचा प्रदेशाध्यक्ष आहे. याचा मान मला मिळाला आहे, याचा मला प्रचंड अभिमान आहे. एका छोट्या कार्यकर्त्यापासून काम करत असताना मला हा मान मिळाला आहे. भाजपाच्या लहान-सहान कार्यकर्त्यांनादेखील

### मुंबईमध्ये पक्षाचा स्थापना दिवस उत्साहात साजरा

काम करताना माझ्यासारखाच अभिमान वाटतो. संपूर्ण वर्षभर विकसित भारताचा स्वप्न घेऊन पक्षातर्फे देशभर व महाराष्ट्रामध्ये विविध कार्यक्रम होत असतात. पुढच्या एक आठवड्यावर मंडळ स्तरावर अशाच प्रकारे विविध कार्यक्रम राबवले जाणार आहेत," असं रवींद्र चव्हाण यांनी सांगितलं.

अटलजींनी पाहिलेलं स्वप्न आज प्रत्यक्षात आलं : याचबरोबर या कार्यक्रमात बोलताना केशव उपाध्याय म्हणाले की, "पक्षाच्या स्थापनेवेळी अटलजींनी पाहिलेलं स्वप्न आज प्रत्यक्षात आलं आहे. भाजपा स्थापना दिवसानिमित्त कठोर राष्ट्रवादाचा उत्सव आपल्याला साजरा करायचा आहे." तर दुसरीकडे दादरच्या केशवसुती कार्यालयामध्ये देखील मोठ्या उत्साहामध्ये भाजपा स्थापना दिवस साजरा करण्यात आला. यावेळी ध्वजवंदन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. संपूर्ण कार्यालयाला रोषणाई करण्यात आली होती. त्याचबरोबर फुलांनी सजवले देखील होते

# आसाममध्ये यंदा भाजप, एनडीए सरकार हॅट्ट्रिक साधणार -पंतप्रधान मोदी

**बारपेटा (आसाम) : वृत्तसंस्था**

आसाममध्ये विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरू आहे. सर्व राजकीय पक्षांकडून जोरदार प्रचार सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सोमवारी आसाममधील बरपेटामध्ये जाहीर सभा पार पडली. यावेळी नरेंद्र मोदी यांनी आसाममध्ये भाजपाच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात झालेल्या विकासकामांचा आढावा घेतला.

याशिवाय राज्याला आत्मनिर्भरतेकडे नेण्याची वेळ आल्याचं सांगत, त्यांनी आसाममध्ये भाजपा-एनडीए सरकार हॅटट्रिक बनवणार असल्याचं म्हटलं आहे. दरम्यान, आसाममधील १२६ जागांसाठी विधानसभा निवडणुका ९ एप्रिल रोजी होणार असून, मतमोजणी ४ मे रोजी होणार आहे.



भाजपाच्या ४७ व्या स्थापना दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या आणि पार्टीच्या 'राष्ट्र प्रथम' या मंत्रावर जोर देत देशाला विकसित व आत्मनिर्भर बनवण्याचा संकल्प केला. "आज, ६ एप्रिल भाजपाचा स्थापना दिवस आहे.

मी देशभरातील आणि जगभरातील भाजपा परिवाराशी संबंधित सर्व लोकांना आणि कार्यकर्त्यांना माझ्या हार्दिक शुभेच्छा देतो. 'राष्ट्र प्रथम' या मंत्रासह, आम्ही सर्वजण भारतमातेच्या सेवेत गुंतलो आहोत. देशाचा विकास करणे आणि भारताला आत्मनिर्भर बनवणं हा आमचा संकल्प आहे. याच संकल्पासह, भाजपा या निवडणुकीत तुमचे आशीर्वाद मागत आहे," असं नरेंद्र मोदी म्हणाले.

नरेंद्र मोदी म्हणाले, "यावेळी तुमचं मत विकसित आसामच्या उभारणीचा पाया अधिक मजबूत करेल. तुम्हा सर्वांना माहीत आहे की, भाजपा जे बोलतो ते करतो. आम्ही आसामला तिथल्या लोकांच्या योग्यतेच्या उंचीवर नेत आहोत.

मानस राष्ट्रीय उद्यान येथून फार दूर नाही. कामाख्या देवीचा आशीर्वाद या संपूर्ण प्रदेशाला लाभला आहे. इथं श्रद्धा आणि अध्यात्माची अनेक प्रमुख स्थळं आहेत. आसाममधील दळणवळण अधिक मजबूत होत असल्यामुळं पर्यटन वाढत आहे, ज्याचा फायदा संपूर्ण प्रदेशाला होत आहे."

# हरवलेले मोबाईल एमआयडीसी पोलिसांनी मूळ मालकांना केले परत

**महाड : प्रतिनिधी**

महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याने हरवलेले मोबाईल शोधून काढण्यामध्ये उल्लेखनीय कामगिरी करताना सहा मोबाईल हस्तगत करीत संबंधित मूळ मालकांना परत केले असून या मोबाईलची एकूण किंमत सुमारे १ लाख ८० हजार रुपये इतकी असल्याचे समजते आहे.



मागील काही कालावधीत महाड एमआयडीसी परिसरात विविध ठिकाणी मोबाईल हरवल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला होता. तपासा दरम्यान आवश्यक तांत्रिक साधनांचा वापर देखील करण्यात आला होता. सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस शिपाई डी. बी. बल्लाळ यांनी हा तपास यशस्वीरित्या पूर्ण केला.या कारवाईत रुपवली येथील विलास सुंबे, नडगाव येथील संकेत सपकाळ, मांघरूण येथील धनश्री शिंदे, बिरवाडी येथील राजेश कांबळे, चांभारखिंड येथील निलेश कदम आणि काळीज येथील राजेश वाले यांचे मोबाईल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले असून सर्व मोबाईल संबंधित मूळ मालकांना परत करण्यात आले आहेत.

दरम्यान, चालू वर्षात महाड एमआयडीसी पोलिसांनी आतापर्यंत एकूण १३ मोबाईल शोधून काढले असून त्यांची एकूण किंमत सुमारे ४ लाख ८९ हजार रुपये आहे.

# बेलापूर विधानसभा मतदारसंघात भाजप स्थापना दिवस साजरा

**नवी मुंबई : बातमीदार**

दारासमोर कमळाची रांगोळी आणि घरावर पक्षाचा ध्वज उभारून कार्यकर्त्यांनी भाजपचा ४६ वा स्थापना दिवस सोमवार रोजी भाजपा नेते महामंत्री निलेश म्हात्रे यांनी दिवाळे गाव येथे जाऊन संविधान फेरी उत्साहात साजरी करण्यात आली.

त्याग, समर्पण व सेवा भावनेतून "अंत्योदय" व सक्षम राष्ट्र निर्मितीच्या कार्यासाठी कटिबद्ध असलेला जगातील सर्वात मोठा पक्ष भारतीय जनता पार्टीच्या स्थापना दिनाच्या निमित्ताने आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या गौरव निवासस्थानी व दिवाळे गाव येथे भाजपा नेते महामंत्री निलेश म्हात्रे व भाजपा पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या उपस्थित संविधान फेरी व ध्वजारोहण सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.



आजच्या दिवशी म्हणजे ६ एप्रिल १९८० ला भाजपाची स्थापना झालेली होती. सुरुवातीला जनसंघ म्हणून ओळख असलेला पक्ष नंतर भारतीय जनता पक्ष नावानं उदयाला आला आहे. भाजपानं आज महाराष्ट्रासह देशपातळीवर ध्वजारोहणाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त तळागाळापर्यंत पोहोचवण्याचा हा प्रयत्न आहे.

यावेळी भाजपा नेते महामंत्री निलेश म्हात्रे यांच्या समवेत माजी नगरसेवक दिना पाटील, जेष्ठ कार्यकर्ता गोपाळराव गायकवाड, समाजसेवक कुंदन म्हात्रे, मंडळ अध्यक्ष अजय सिंग, भूषण कोळी, मनीष बिजलानी, जयदेव ठाकूर, विष्णू भिरुड, निलेश पाटील, ज्ञानेश्वर कोळी, कैलास कोळी, जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र अध्यक्ष चंद्रकांत कोळी, डोलकर मच्छिमार संस्था अध्यक्ष तुकाराम कोळी, खांदेवाले मच्छिमार संस्था अध्यक्ष रमेश हिंडे, फगवाले मच्छिमार संस्था अध्यक्ष अनंता बोस, वेताळेश्वर मंदिर अध्यक्ष सुरेश कोळी, राजू कोळी , कल्पेश कुंभार, हेमंत पाटील, अल्ताफ धीरू, तसेच असंख्य आजी माजी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# म्हात्रेंकडून उद्यानातील प्रलंबित कामांचा केला पाहणी दौरा

**नवी मुंबई : बातमीदार**

माजी नगरसेवक तथा भाजपा महामंत्री निलेश म्हात्रे यांनी नवी मुंबई महानगरपालिका सानपाडा विभागाचे उप अभियंता(स्थापत्य) विश्वनाथ लोकरे व इतर अधिकाऱ्यांसमवेत सानपाडा येथील कै. सीताराम मास्तर उद्यानातील विविध प्रलंबित कामांचा तसेच नागरी विकासाशी संबंधित कामांचा आज सखोल पाहणी दौरा करण्यात आला.



या पाहणी दौऱ्यादरम्यान उद्यानातील स्वच्छता, सुशोभीकरण, पायाभूत सुविधा, बसण्याची आसन व्यवस्था, सुरक्षारक्षक नेमणे, बालकांसाठी खेळणी, पाणपोई, तरुणांसाठी व ज्येष्ठ नागरिकांसाठी ओपन जिम, हायटेन्शन खालील सर्व गार्डन विकसित करणे, सानपाडा पोलीस चौकी समोरील जागेवरचा कबुतर खाना बंद करणे, तसेच संत शिरोमणी उद्यानाममध्ये पाणीपोई सुविधा उपलब्ध करणे, उद्यानातील स्वच्छता, प्रकाशयोजना यांचा आढावा घेण्यात आला. काही कामे अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले असून संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना ती कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना माजी नगरसेवक निलेश म्हात्रे यांनी दिल्या.

त्याच बरोबर नागरिकांना अधिक दर्जेदार सुविधा उपलब्ध व्हाव्यात, उद्यान सुरक्षित व आकर्षक बनावे, तसेच नागरिकांना विरंगुळा व आरोग्यदायी वातावरण मिळावे यासाठी आवश्यक त्या सर्व सुधारणा करण्यात येणार असल्याचे यावेळी माजी नगरसेवक निलेश म्हात्रे यांनी सांगितले.

# वाईन शॉपबाहेर दोन गटात राडा

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरालगतच्या खांदा गावात मध्यरात्रीच्या सुमारास एका वाईन शॉपबाहेर दोन गटांमध्ये जोरदार राडा झाला. दारू खरेदी करण्याच्या कारणावरून सुरू झालेल्या वादाचे रूपांतर पाहता पाहता मोठ्या हाणामारीत झाले. विशेष म्हणजे, या वादाला जुन्या निवडणुकीच्या संघर्षाची पार्श्वभूमी असल्याचे समोर आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मध्यरात्री २ वाजण्याच्या सुमारास खांदा गावातील एका वाईन शॉपवर दोन्ही गट समोरासमोर आले. सुरुवातीला शाब्दिक चकमक झाली, मात्र जुन्या वैमनस्याची ठिणगी पडल्याने दोन्ही बाजूंनी एकमेकांवर काठ्या आणि लाथाबुयांनी हल्ला चढवला. हा राडा इतका भीषण होता की, यात काही जण गंभीर जखमी झाले आहेत. या संपूर्ण घटनेचा थरारक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत असून, त्यात आरोपी एकमेकांना बेदम मारहाण करताना स्पष्ट दिसत आहेत.या घटनेची माहिती मिळताच पनवेल पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली.

# रायगड जिल्ह्यात 'बेटी बचाव बेटी पढाव'चा नारा

**अलिबाग : प्रतिनिधी**

महिला व बालविकास विभाग, रायगड जिल्हा परिषद आरोग्य विभाग, जिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने कलारंग सांस्कृतिक सामाजिक संस्थेच्या माध्यमातून 'बेटी बचाव बेटी पढाव' हे जनजागृतीपर अभियान ८ ते २८ मार्चदरम्यान राबविण्यात आले. यावेळी संपूर्ण रायगड जिल्ह्यात ४० पथनाट्य व चित्ररथाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली.



गर्भलिंग निदान, स्त्रीभ्रुण हत्या, स्त्री-पुरूष समानता, किशोरवयीन मुलींचे शारीरिक मानसिक बदल व समुपदेशन, मासिक पाळी गैरसमज व सुरक्षितता, गर्भलिंग निदान व स्त्रीभ्रुण हत्येविरोधात ठोस कायदा व अंमलबजावणी, शिक्षा तसेच बनावट केस व खबरी योजनेची माहिती तसेच मुलींसाठीच्या शैक्षणिक सुविधा, एचपीव्ही लसीकरण आदी विषयांवर जनजागृतीपर पथनाट्य सादर करण्यात आले.

### पथनाट्य, चित्ररथातून केली जनजागृती

या जनजागृतीपर अभियानास जिल्हाधिकारी किशन जावळे, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील, सभापती वैकुंठ पाटील, सभापती चंद्रकांत कळंबे, सभापती नारायण डामसे, सभापती रसिका केणी, गटनेते अमित नाईक, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर, महिला व बालविकास कार्यक्रम अधिकारी निर्मला कुचिक यांचे विशेष मार्गदर्शन लाभले असून राजिप जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी आरोग्य विभाग रेश्मा संकपाळ ॲड. नीता कोळी व सुशील साईकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

कलारंग सांस्कृतिक सामाजिक संस्था या लोककलापथकाचे कलाकार शेखर झावरे, योगेश पाटील, विशाल गोरड, विनोद नाईक, अभिजीत चांदोस्कर, तन्वी पाटील, पुनम म्हात्रे यांनी विशेष परिश्रम घेतले

पान १ वरुन

## पनवेलमध्ये भाजपचा स्थापना दिन उत्साहात साजरा

या कार्यक्रमाला पनवेल पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, महापालिकेच्या महिला व बाल कल्याण सभापती ममता म्हात्रे, नगरसेवक अजय बहिरा, नगरसेविका दर्शना भोईर, महिला मोर्चाच्या शहराध्यक्ष नगरसेविका रूचिता लोंढे, प्रीती जॉर्ज, श्वेता भोईर, माजी नगरसेवक सुनील बहिरा, प्रभाकर बहिरा, माजी नगरसेविका नीता माळी, अनुराधा ठोकळ, सारिका भगत, नलिनी शेलार, सुलोचना कल्याणकर, सुहासिनी शिवणेकर, सपना पाटील, लीना पाटील, शहर सरचिटणीस अमित ओझे, केदार भगत, रूपेश नागवेकर, निलेश म्हात्रे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते, मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, भाजप स्थापना दिनानिमित्त पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी आपल्या घरांवर पक्षध्वज फडकावले असून पक्ष कार्यालयांना आकर्षक सजावट व विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

# नवी मुंबईत व्यसनमुक्ती जनजागृती अभियान

**नवी मुंबई : बातमीदार**

समाज प्रबोधनकार दिलीप आमले यांच्या पुढाकारातून नवी मुंबई परिसरात व्यापक व्यसनमुक्ती जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. शहरातील प्रमुख चौक, रिक्षा-टॅक्सी-टेम्पो-बस-ट्रक चालक, कामगार, शाळा, कॉलेज, सामाजिक संस्था तसेच विविध युनियनमध्ये "त्रिमूर्ती व्यसनमुक्ती जनजागृती अभियान" प्रभावीपणे सुरू आहे.

या अभियानांतर्गत दारू, गुटखा, मावा, तंबाखू, सिगारेट यांसारख्या घातक व्यसनांपासून दूर राहण्यासाठी मार्गदर्शन व संवाद कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. आमले यांनी गेल्या २० ते २२ वर्षांपासून व्यसनमुक्ती जनजागृती, समाज प्रबोधन आणि मार्गदर्शनाचे कार्य सातत्याने सुरू ठेवले आहे. त्यांनी शाळा, महाविद्यालये, कामगार व वाहन चालक, आरटीओ कार्यालय तसेच वाहतूक पोलिसांमध्ये जाऊन लाखो लोकांपर्यंत व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचवला आहे.

दर गुरुवारी सकाळी ११ वाजता नवी मुंबई आरटीओ कार्यालयात लर्निंग लायसन्ससाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन व संवाद सत्र आयोजित केले जाते. या व्यसनमुक्ती चळवळीत अधिकाधिक नागरिकांनी सहभागी व्हावे तसेच व्यसनमुक्तीवरील व्याख्यान आयोजित करण्यासाठी इच्छुकांनी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.



# अखंड हरिनाम सप्ताह



**पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण-कोपर यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही भव्य अखंड हरिनाम सप्ताह आणि ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा गव्हाण येथील श्री शांतादेवी मंदिरात ३१ मार्चपासून मोठ्या उत्साहात सुरू असून याची सांगता ७ एप्रिल रोजी होणार आहे. सप्ताहाच्या निमित्ताने पहाटे काकडा आरती, सकाळी ज्ञानेश्वरी पारायण, सायंकाळी प्रवचन आणि रात्री विविध नामवंत कीर्तनकारांची कीर्तने असे भक्तिमय कार्यक्रम संपन्न होत आहेत. दरम्यान, रविवारी विविध धार्मिक कार्यक्रम सादर झाले. या सप्ताहाची सांगता मंगळवारी हभप श्रावणमहाराज अहिरे यांच्या काल्याच्या कीर्तनाने होईल.**

# भाजप स्थापना दिनाचा उत्साह



पनवेल : भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त शेलघर येथील घरी सपत्नीक पक्षध्वज फडकाविला.



**उलवे नोड : भारतीय जनता पक्षाच्या ४६व्या स्थापना दिनानिमित्त ज्येष्ठ नेते अनंतशेठ ठाकूर यांच्या हस्ते सेक्टर १७ भाजप ऑफिस येथे पक्षध्वज फडकाविण्यात आला. यावेळी माजी उपसरपंच विजय घरत, ॲड. योगिता सुहास भगत, युवा मोर्चा अध्यक्ष विराज देशमुख, सुधीर ठाकूर, व्ही.के. ठाकूर, जीवन भगत, सुदर्शन घरत, संदीप म्हात्रे, भाऊ भोईर, कमलाकर देशमुख, सुहास भगत, ज्ञानेश्वर म्हात्रे, महेश भगत, दयानंद घरत, आर.सी. घरत, नितीन ठाकूर, गजानन घरत, कैलास घरत आदी उपस्थित होते.**



उरण : येथील भाजप संपर्क कार्यालयात आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी भाजपचा स्थापना दिन साजरा करण्यात आला. यावेळी उपनगराध्यक्ष रवि भोईर, शहर अध्यक्ष कौशिक शाह, नगरसेवक जयविन कोळी, जसिम गॅस, युवा शहर अध्यक्ष निलेश पाटील, हितेश शाह, कामगार नेते सुरेश पाटील, मनोहर सहतिया, कुंदन गायकवाड, देवेंद्र पाटील, गोपीचंद म्हात्रे, संकेत घरत, कृष्णा ठाकूर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



पनवेल : भारतीय जनता पक्षाच्या ४६व्या स्थापना दिनानिमित्त भाजप उलवा नोड महिला मोर्चा अध्यक्ष ॲड. योगिता भगत यांच्या घरी आणि बूथ अध्यक्ष ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या घरी पक्षध्वज फडकवून पक्षाचा स्थापना दिन साजरा करण्यात आला. यावेळी युवा कार्यकर्ते सुहास भगत, जीवन भगत, सुदर्शन घरत, संतोष भगत, निशा म्हात्रे, महेश भगत, मधुकर म्हात्रे आदी उपस्थित होते.



पनवेल : आपटा येथे भाजपच्या स्थापना दिनानिमित्त पक्षध्वज फडविण्यात आला. यावेळी पंचायत समिती सदस्य मयूर शेलार, ज्येष्ठ नेते ज्ञानेश्वर भोईर, सुबोध ठाकूर उपस्थित होते.

## करंजाडेत भाजपचा स्थापना दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

करंजाडे भाजप जनसंपर्क कार्यालयात भाजपचा ४६वा स्थापना दिवस मोठया उत्साहात करण्यात आला. यावेळी असंख्य कार्यकर्त्यांच्या कष्टातून आणि योगदानातून भारतीय जनता पक्षाचे रूपांतर आज वटवृक्षात झाले आहे, असे प्रतिपादन भाजप नेते करंजाडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांनी केले.



या कार्यक्रमाला पश्चिम मंडळ अध्यक्ष रुपेश धुमाळ, गजानन पाटील माजी उपसरपंच, पंचायत समिती सभापती रंजना वास्कर, जिल्हा परिषद सदस्य सोनाली जितेकर, मानखुश नाईक युवा नेता, बळीराम म्हात्रे माजी सरपंच, अनुज जितेकर युवा नेते, प्रथमेश पुंडे संयोजक, भरत राणे मंगेश बोरकर, अतिष साबळे सदस्य, तुषार नागे सदस्य, नाथा भरवाड, राजेश गायकर, शैलेश चव्हाण, उमेश भोईर, केतन आंग्रे, धोंडू भोईर, सतीश धुमाळ पांडुरंग मामले, सुषमा मयेकर महिला अध्यक्ष करंजाडे, चैताली माळी, ज्योती तातरे, नसीम शेख, सर्वरी पोयितकर, अन्वी गुरव, रश्मी गुप्ता, कांता गायकवाड, श्रुती दिवेकर, वर्षा गायकवाड, रुपाली नागे, निशा गायकवाड, शर्मा मॅडम, सुरेश भोईर, विनेश गायकवाड, प्रितम फडके, प्रकाश भोईर, हरेश आंग्रे, गणेश भोईर, अशोक विखारे रिक्षा संघटना अध्यक्ष, जहीर शेख ओंकार चौधरी, जितू सिशवे उपस्थित होते.

पश्चिम मंडळ अध्यक्ष रुपेश धुमाळ म्हणाले की, सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास तसेच 'राष्ट्र प्रथम' या मंत्राला आदर्श ठेवून सर्व समावेशक कार्यशैलीतून भाजपकडून देशात विकास सुरू आहे.

## निवडक

### पाच डंपरमधून डिझेल चोरी

**पनवेल :** अज्ञात चोरट्यांनी रस्त्यावर उभ्या असलेल्या ५ डंपरमधून ७५० लिटर डिझेल चोरून नेल्याची घटना घडली. या प्रकरणी पनवेल शत्तर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दशा केंद्रे हे पनवेल येथे राहत असून त्यांचा बालाजी ट्रान्सपोर्ट या नावाने ट्रान्सपोर्टचा व्यवसाय आहे. डंपर कल्पतरू इमारत साईट ऑफिस पनवेल येथे रोडवर पार्क करून चालक त्यांच्या खोलीत झोपले होते. दरम्यान, मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी या ५ डंपरमधून डिझल चोरुन नेले. ३ एप्रिल रोजी सकाळी ते डंपर पार्क केलेल्या ठिकाणी गेले असता, पाचही डंपरच्या डिझेल टाकीचे लॉक तोडल्याचे तसेच त्यातील ७५० लिटर डिझेल चोरीला गेल्याचे दिसून आले.

### सिलिंडरचा अवैध साठा; गुन्हा दाखल

**पनवेल :** गॅसच्या ३३ सिलिंडरचा साठा केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी सोमराज कृष्णा रामदारा (रा. पळस्पे फाटा) यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. चिंचवण गावाजवळ व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडरमध्ये घरगुती गॅस भरून ते जास्त दराने विक्री केली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी छापा मारला. यावेळी कोकमखळ येथील शेतातील पत्र्याच्या शेडमध्ये इंडेन, गो गॅस आणि एचपी गॅसचे एकूण ३३ सिलिंडर सांपडले. त्यावर पोलिसांनी सोमराज विरोधात गुन्हा दाखल केला आहे.



**पनवेल : ज्येष्ठ सनदी अधिकारी रुबल अग्रवाल यांनी नुकतीच कोकण विभागीय आयुक्तपदाची सूत्रे स्वीकारली आहेत. पनवेल तालुका पत्रकार महासंघाच्या वतीने त्यांची भेट घेऊन शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी महासंघाचे अध्यक्ष तथा साप्ताहिक रायगड शिव सम्राट वृत्तपत्राचे संपादक रत्नाकर पाटील, कोकण विभागीय माहिती कार्यालयाचे प्रभारी उपसंचालक (माहिती) मनोज सानप आणि पत्रकार सुभाष वाघपंजे उपस्थित होते.**

### दुकानाचे शटर उचकटून चोरी

**पनवेल :** दत्तराज सोसायटीतील एका झेरॉक्स दुकानाचे शटर उचकटून अज्ञात चोरट्याने दुकानातील रोख रक्कम चोरून नेल्याची घटना ४ एप्रिल रोजी मध्यरात्री घडली. शहरातील फडके नाट्यगृहाजवळील दत्तराज सोसायटीतील शिवशंभो झेरॉक्स आणि स्टेशनरीचे शटर चोरट्यांनी उचकटले आणि रोख रक्कम चोरून नेली. दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे हे दुकान उघडल्यानंतर दुकानात चोरी झाल्याचे लक्षात आले. त्यानंतर त्यांनी या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या तक्रारीत त्यांनी चोरट्याने रोख रकमेसह बनावट नोटा चोरून नेल्याचे सांगितले. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

## डेरवली येथे दुचाकी चोरणारा गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

डेरवली परिसरात वाहतूक नियमन करत असताना पनवेल वाहतूक शाखेच्या पोलिसांनी दाखवलेल्या प्रसंगावधानाने एका दुचाकी चोरट्याला अटक करण्यात यश आले आहे.



पनवेल वाहतूक शाखा अंतर्गत असणारे डेरवली या ठिकाणी, पोलीस हवालदार सतीश वाघमारे आणि राकेश घाडगे असे वाहतूक नियमन कर्तव्य करीत असताना त्यांना एक बेवारस विना नंबर प्लेटची एक्सेस १२५ पांढऱ्या रंगाची स्कुटी उभी दिसली. सदर स्कुटीला दोन्ही नंबर प्लेट नसल्याने स्कुटी बाबत संशय निर्माण झाला. या स्कुटीवर लक्ष ठेवून वाहतूक नियमन करत असताना २०.४५ वा.सुमारास एक अनोळखी व्यक्ती संशयास्पदरीत्या सदर स्कुटीजवळ येऊन स्कुटी भोवती फिरून स्क्रू ड्रायव्हरने हॅंडल तोडून त्यानंतर स्कुटी चालू करायचा प्रयत्न केला पण स्कुटी स्टार्ट न झाल्याने स्कुटी थोडीशी पुढे ढकलून थांबवली तसेच कचऱ्यातून एक प्लास्टिकची पाणी पिण्याची मोकळी बॉटल बाहेर काढली व पेट्रोल आणण्याकरता गेला.

या व्यक्तीबाबत संशय बळावल्याने सदरची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांना दिली असता त्यांनी तात्काळ पोलीस उपनिरीक्षक शेरखाने यांना घटनास्थळी पाठविले. काही वेळातच हा व्यक्ती बॉटलमध्ये पेट्रोल घेऊन आला व स्कूटीमध्ये टाकत असताना ट्रॅप लावून त्या इसमास ताब्यात घेतले. त्या व्यक्तीविषयी संशय अधिक वाढल्याने स्कुटीच्या डिकी चेक केले असता वाहनाच्या कागदपत्राच्या झेरॉक्स प्रति मिळाल्याने मूळ मालकाला संपर्क साधला असता. त्यांनी कळवले की, एक्सेस १२५ स्कुटी (एचएच ०३ डीटी ४७२२) नमूद स्कूटर चोरी झाल्याबाबत २७ मार्च २०२६ रोजी आरसीएफ पोलीस स्टेशन चेंबूर येथे गुन्हा दाखल असल्याचे समोर आले.

संशयित इसम व संशयित इसमाच्या ताब्यात मिळून आलेली स्कुटी संशयित व्यक्तीचा मोबाईल यास पुढील कारवाई करता पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे ताब्यात दिले.

## गुंतवणुकीचे आमिष दाखवून फसवणूक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्रिप्टो करन्सीमध्ये इन्व्हेस्टमेंट करण्यास सांगून जास्त परतावा देण्याचे आमिष दाखवले आणि ३८ लाख ३१ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात २ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

जितेंद्र कुमार श्रीवास्तव हे रिस गाव, रसायनी येथे राहत असून त्यांना काव्य जैन या महिलेचा व्हाट्सअप कॉल आला आणि तिने क्रिप्टो करन्सी मध्ये ट्रेंडिंग करण्यास सांगितले आणि त्यानंतर ट्रेडिंग एक्सपर्ट शशिकांत यांचा मोबाईल नंबर पाठवून ते तुम्हाला शिकवतील असे सांगितले. त्या नंबर वर कॉल केले असता ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. आणि लिंक पाठवली. त्यानंतर फॉर्म भरण्यात आला आणि त्यांनी दहा हजार रुपये टाकले. त्यात त्यांना नफा मिळाला. त्यानंतर सतत ट्रेंडिंग केली तर नफा मिळेल आणि नफ्यातून ३० टक्के आम्हाला द्यावे लागतील असे सांगितले. त्यानुसार जितेंद्र कुमार यांनी ३८ लाख ३१ हजार रुपये गुंतवणूक केले.

यावेळी एक कोटी १८ लाख रुपये नफा झाल्याचे ॲपवर दिसले ते बँक खात्यात ट्रान्सफर करत असताना आले नाहीत. यावेळी ४० लाख रुपये सिक्युरिटी डिपॉझिट भरावा लागेल असे सांगितले. मात्र त्यांनी ते भरण्यास नकार दिला. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी गुन्हा दाखल केला.

## गाडीची काच फोडून सोन्याचे दागिने आणि रोख रकमेची चोरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हॉटेलच्या पार्किंग मध्ये गाडी पार्क करून जेवणासाठी गेलेल्या नागरिकांच्या गाडीची काच फोडून सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेल्याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात १ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

योगेश शिंदे हे पंतनगर, घाटकोपर येथे राहत असून एक एप्रिल रोजी फॉर्च्युनर गाडी (एमएच ०२ डीजे ९२९९) मधून आणि बहीण रूपाली चव्हाण व त्यांचे कुटुंब फॉर्च्युनर गाडी (एमएच ०१ एएक्स ७८४८)ने मुंबई कडे येत होते. दुपारी सव्वा तीनच्या सुमारास गो ग्रीन हॉटेल, कल्हेगाव येथे जेवणासाठी थांबले. त्यांनी गाडी गो ग्रीन हॉटेलच्या बाहेरील पार्किंग मध्ये पार्क केल्या. पावणे पाचच्या सुमारास गाडी पार्क केलेल्या ठिकाणी आले. यावेळी

फॉर्च्यूनर गाडी (एमएच १ एएक्स ७८४८) च्या गाडीची काच फुटलेली दिसली. यावेळी सीसीटीव्ही कॅमेऱ्याची तपासणी केली असता एक टोपी घातलेला अनोळखी ईसम गाडीजवळ येऊन काच फोडून गाडीतील वस्तू चोरी करून दुचाकी वरून आलेल्या दुसऱ्या इसमासोबत निघून गेल्याचे दिसून आला. त्यावेळी त्यांच्या गाडीतून सोन्याचे दागिने, रोख रक्कम, आधार कार्ड, पॅन कार्ड, डेबिट कार्ड, लॉकरच्या चाव्या असा एकूण १३ लाख ७५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला.

## रायगड प्रेस क्लबचा २१वा वर्धापन दिन : पनवेल येथे पत्रकार सन्मान सोहळा रंगणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड प्रेस क्लब या पत्रकारांच्या सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या संघटनेचा २१वा वर्धापन दिन सोहळा तसेच पनवेल महानगर प्रेस क्लब प्रथम वर्धापन दिनानिमित्त विशेष सन्मान सोहळा बुधवार ८ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पनवेल येथे साजरा होत आहे.

या सोहळ्यात राज्यस्तरीय संपादक पुरस्कार आणि जिल्हास्तरीय पत्रकारिता पुरस्कार व पनवेल महानगर प्रेस क्लबतर्फे विशेष सन्मान पुरस्कार हे मंत्री, खासदार आमदार महोदयांचे हस्ते केले जाणार आहे. मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त व रायगड प्रेस क्लबचे संस्थापक एस.एम.देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सोहळ्यासाठी प्रमुख मान्यवर म्हणून राज्याचे मत्स्य व बंदर विकास मंत्री नितेश राणे, विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, खासदार सुनील तटकरे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, आमदार विक्रांत पाटील, मराठी पत्रकार परिषद अध्यक्ष मिलिंद अष्टिवकर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कामगार नेते महेंद्र घरत, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, शिवसेना महानगरप्रमुख नगरसेवक प्रथमेश सोमण, मराठी पत्रकार परिषद कोकण विभाग सचिव मनोज खांबे, रायगड पर्स क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे, पनवेल महानगर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे यासंह जिल्ह्यातून शेकडो पत्रकार उपस्थित राहणार आहेत.

### यांना देण्यात येणार पुरस्कार

आचार्य अत्रे राज्यस्तरीय संपादक सन्मानः कमलेश सुतार (संपादक, झी २४ तास), रायगड प्रेस क्लब जीवन गौरव सन्मानः उमाजी केळुस्कर (अलिबाग), निशिकांत जोशी स्मृती पत्रकार सन्मानः नरेश पवार (पेण), क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महिला पत्रकार सन्मानः तृप्ती पालकर (पनवेल), दीपक शिंदे स्मृती व्हिडिओ जर्नालिस्ट सन्मानः स्वप्नील दुधारे (पनवेल), प्रकाश काटदरे स्मृती निर्भीड पत्रकार सन्मानः. रवींद्रनाथ ओव्हाळ (पाली), संतोष पवार स्मृती युवा पत्रकार सन्मानः शिवराज पार्टे (पोलादपूर), ॲड. जनार्दन पाटील स्मृती शोध पत्रकार सन्मानः विद्यानंद ओव्हाळ (कर्जत), डॉ. सचिन पाटील स्मृती पत्रकारिता सन्मानः शशिकांत मोरे (रोहा), प्रेस क्लब ॲक्टिव्ह जर्नालिस्ट सन्मानः चंद्रहास नगरकर (महाड) व .अमूलकुमार जैन (मुरूड), रायगड प्रेस क्लब विशेष सन्मानः. अजय कदम (माथेरान) व . रवींद्र मोरे (खोपोली) याशिवाय, रायगड प्रेस क्लब सामाजिक कार्यकर्ता सन्मानः सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था (कोलाड) व हेल्प फाउंडेशन (खोपोली), रायगड जिल्हा श्रमिक पत्रकारिता सन्मानः . हरेश साठे (पनवेल) व विश्वजीत लुमन (रोहा) यांना शाल सन्मानचिन्हे देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

**पनवेल प्रेस क्लबचेही विशेष सन्मान पुरस्कार**

या भव्यदिव्य कार्यक्रम प्रसंगी पनवेल महानगर मधील समाजासाठी विशेष योगदान देणारे व्यक्तिमत्व सुप्रसिद्ध नेत्रतज्ञ सुहास हळदीपुरकर, महारेराचे डायरेक्टर सुधाकर देशमुख, पत्रकारिकेतील जीवन गौरव पुरस्कार रमेश भोळे, समाज प्रेरणा सन्मान विजय लोखंडे, व युवा उद्योजक वैभव ढवळे, यांनाही सन्मानचिन्हे, ट्रॉफी देऊन गौरविण्यात येणार आहे.

## संपादकीय

# खरातचा पाय खोलात!

सुरुवातीला महिलांच्या शोषणाच्या आरोपांमुळे चर्चेत आलेल्या अशोक खरात प्रकरणाने आता आर्थिक गैरव्यवहाराचेही वळण घेतले आहे. सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) या प्रकरणात मनी लॉण्डरिंगचा गुन्हा दाखल केला आहे. त्यामुळे हा मुद्दा केवळ लैंगिक कृत्यांपुरता मर्यादित राहत नाही, तर मोठ्या प्रमाणात आर्थिक पातळीवरही घडला असल्याचे समोर आले आहे. यात आणखी काही लोक सामिल असू शकतात.

**खरात प्रकरणातील सर्वात वेदनादायक बाब म्हणजे महिलांचे लैंगिक शोषण. समाजात आजही अनेक महिला भीती, लाज आणि सामाजिक बदनामीच्या भीतीमुळे पुढे येत नाहीत. या प्रकरणाने पुन्हा एकदा दाखवून दिले की, महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न केवळ कायद्यांवर अवलंबून नसून त्याच्या प्रभावी अंमलबजावणीवरही तितकाच अवलंबून आहे. दरम्यान, ईडीने मनी लॉण्डरिंगचा गुन्हा दाखल केल्याने या प्रकरणाला एक वेगळीच दिशा मिळाली आहे. फसवणूक करून कोट्यवधी रुपयांची मालमत्ता उभारल्याचे आरोप हे केवळ वैयक्तिक गैरकृत्य नसून संगठित आर्थिक गुन्ह्यांचे संकेत देतात. जर एखादी व्यक्ती सामाजिक प्रभावाचा किंवा विश्वासाचा गैरवापर करून आर्थिक साम्राज्य उभारते, तर ते समाजासाठी अधिक धोकादायक ठरते, कारण अशा प्रकारचे गुन्हे केवळ काही व्यक्तींना फसवत नाहीत, तर संपूर्ण आर्थिक व्यवस्थेवर परिणाम करतात. नाशिक पोलिसांनी दिलेल्या माहितीच्या आधारे ईडीने तपास सुरू केला आहे, ही सकारात्मक बाब म्हणावी लागेल. पोलिसांनी जमा केलेली कागदपत्रे ईडीने ताब्यात घेतल्यामुळे आता आर्थिक व्यवहारांची साखळी उलगडण्यास मदत होईल. अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये पैशाचा प्रवाह, बनावट व्यवहार, शेल कंपन्या किंवा बेकायदेशीर गुंतवणूक यांचा मागोवा घेणे अत्यंत आवश्यक असते. त्यामुळे या तपासातून केवळ खरातच नव्हे, तर त्याच्याशी संबंधित असलेल्या इतर व्यक्ती किंवा जाळेही समोर येण्याची शक्यता आहे. या प्रकरणाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे समाजातील नैतिक अध:पतन. एखादी व्यक्ती महिलांचे शोषण करत असताना आणि फसवणुकीच्या माध्यमातून संपत्ती जमवत असताना समाजातील काही घटक त्याला पाठिंबा देतात किंवा दुर्लक्ष करतात, ही बाबही तितकीच गंभीर आहे. याचबरोबर माध्यमांची भूमिकादेखील महत्त्वाची ठरते. अशा प्रकरणांना योग्य प्रकारे प्रकाशात आणणे, पीडितांच्या आवाजाला बळ देणे आणि तपास प्रक्रियेवर लक्ष ठेवणे ही माध्यमांची जबाबदारी आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी आणि आर्थिक गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी अधिक सक्षम यंत्रणा उभारण्याची गरज आहे. तक्रारींचे त्वरित नोंदणीकरण, जलदगतीने तपास आणि न्यायालयीन प्रक्रियेचा वेग वाढवणे, या गोष्टी अत्यावश्यक आहेत तसेच आरोपी प्रभावशाली असो वा सामान्य, कायद्यापुढे सर्व समान आहेत हा संदेश ठोसपणे पोहचणे गरजेचे आहे. शेवटी, अशोक खरात प्रकरण हे केवळ एका व्यक्तीच्या गुन्ह्यांचे कथानक नाही, तर आपल्या समाजातील आणि व्यवस्थेतील अनेक त्रुटींचे प्रतिबिंब आहे. या प्रकरणाचा तपास निष्पक्ष, सखोल आणि जलदगतीने झाला, तर तो भविष्यात अशा गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी एक आदर्श ठरू शकतो. पीडित महिलांना न्याय मिळणे, आर्थिक गैरव्यवहार उघडकीस येणे आणि दोषींना कठोर शिक्षा होणे हीच या प्रकरणातून समाजाची अपेक्षा आहे. राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली संवेदनशील सरकार आहे आणि स्वत: मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणात कुणालाही सोडणार नाही, असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे जर यात खरातसह आणखी कोण गुंतले असेल, तर त्यांच्या मुसक्या नक्की आवळल्या जातील.**

# जागतिक आरोग्य दिन – ७ एप्रिल




दरवर्षी ७ एप्रिल रोजी जागतिक आरोग्य दिन साजरा केला जातो. जो जागतिक आरोग्य संघटनेच्या स्थापना दिनाचे ( ७ एप्रिल १९४८) एक प्रतीक आहे. हा दिवस जागतिक आरोग्य समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि आरोग्य विषयक आव्हानांवर उपाय शोधण्यासाठी १९५०पासून साजरा केला जात आहे.

जागतिक स्तरावर आरोग्य समस्या उदा. महामारी, माता मृत्यू, करोना यावर विचार करणे आणि लोकांना आरोग्याबद्दल जागरूक करणे हा आहे. तसेच शारिरीरिक आणि मानसिक आरोग्याचे महत्व पटवून देणे, आरोग्य सेवा सुधारणे आणि साथीच्या आजारांबद्दल माहिती देण्याचे काम केले जाते.

दरवर्षी जागतिक आरोग्य दिन हा एक थीम घेऊन साजरा केला जातो. ह्या २०२६ ची थीम ही "आरोग्यासाठी एकत्र, विज्ञानाच्या पाठीशी उभे राहा " ही आहे. ७ एप्रिल २०२६ रोजी साजरा होणाऱ्या या दिनाचा मुख्य उद्देश विज्ञानावर आधारित आरोग्य सेवांना बळकट करणे आणि जागतिक आरोग्य आव्हानाचा एकत्रित सामना करणे हा आहे. जागतिक आरोग्य आव्हानांना तोंड देण्यासाठी विज्ञान आधारित उपायांवर विश्वास ठेवणे आणि वैज्ञानिक ज्ञानाचा वापर करणे हा आहे.

साधारण ७५ वर्षांपूर्वी मानवाचे आयुर्मान फार कमी होते. आता ते ८० वर्ष पर्यंत झाले आहे. गेल्या ७५ वर्षात विज्ञानाने खूप प्रगती केली आहे. विविध रोगांवर मात केली आहे. विविध लसींचा शोध लावला आहे. आपण पोलिओवर मात केली आहे. देवी सारख्या रोग नष्ट केला आहे. आज बऱ्याच रोगांवर औषधी आहेत. बऱ्याच शस्त्रक्रिया यशस्वीपणे केल्या जातात, परंतु आता हे शक्य झाले आहे.

एव्हढे असून सुद्धा मानवाचे चांगले आरोग्य हे एक मोठे आव्हानच आहे. अगोदर बी.पी., शुगर नव्हती. आता हे दोन रत्न जणू काही मानवाला देणगीच मिळाली आहे असे वाटते. बी.पी. शुगर हे अगदी सामान्य झाले आहे. काही लहान लहान मुलांना खूप साखर असते. ही साखर येते तरी कुठून. ७५ वर्षांपूर्वी बी.पी.. शुगर नव्हते. हे श्रीमंतांचे आजार होते. आता हे अगदी सामान्य झाले आहे. ह्याला कारण म्हणजे माणसाची जीवनशैली. अगोदर माणूस सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत काबाड कष्ट करायचा त्यामुळे त्याला बी.पी. शुगर अजिबात नव्हते. जे काही तो खात होता त्याची पूर्ण चरबी जळून जात होती. आता बैठे काम झाल्यामुळे चरबी वाढत जाते. त्याचे रूपांतर मांड्या व पोट वाढणे ह्यात होते व पोट वाढल्यामुळे घुटण्यावर ताण पडतो आणि घुटने दुखीचा त्रास सुरु होतो.

महिलांचे सुद्धा तेच झाले आहे. अगोदर सर्व महिलांचे बाळंपण अगदी सहज व्हायचे. आता तर सिझरिंग शिवाय बाळंतपण होतच नाही. कारण तिच्या शरीराला व्यायामाचं नाही. त्यामुळे त्याचे रूपांतर आता सिझरिंग मध्ये झाले आहे. अगोदर महिला घरची कामे स्वतःच करायच्या. धून –भांडी, पाणी भरणे, सडा सारवान, झाड झूड ह्यामुळे त्यांचा व्यायाम व्हायचा. आता प्रत्येक कामाला मेड आणि मशिनी आहेत. प्रत्येकाची लेक ही लाडकी झाली आहे ती आता जिमला जाऊ लागली आहे. जॉगिंग करीत आहे. पण पाहिजे तसे आरोग्य तिला मिळत नाही आहे.

अगोदर प्रतिकार शक्ती उत्तम होती. ऍलर्जी हा प्रकार माहीतच नव्हता. सगळी मुलं धुळीतच खेळत होती. आता मुलांना ती सवयच राहिली नाही. त्यामुळे मुलं ही नाजूक झाली आहेत. अगोदर मुलं कष्ट करायची, मैदानी खेळ खेळायची. आता मोबाईल आल्यामुळे मैदानी खेळ हे बंदच झाले आहे. अगोदर मुलं खेळायला जाण्यासाठी हाक मारत असत चाल रे. ही हाक आता बंदच झाली आहे.

विज्ञानाने एव्हढी प्रगती करून सुद्धा आरोग्याचे आजही मोठे आव्हान आहे. आता तरुणपणी लहान वयात हार्ट अटॅक यायला लागली आहेत. लहान वयातच चष्मा लागायला लागला आहे. फार कमी वयात डोक्यावरचे केस गळायला लागले आहेत. काहींचे पांढरे व्हायला लागले आहेत. मुलांचे वजन वाढत आहे. त्यांच्यामध्ये स्थूलपणा वाढला आहे. मानसिकदृष्टया सुद्धा मुलं कमजोर झाली आहोत. त्यांच्यावर प्रचंड ताण आहे. स्पर्धा झाल्यामुळे मुलं दबावात आहे.

ह्या सर्व आरोग्याच्या आव्हानांवर सामोरे जाणे हे एक खूप मोठे आव्हान आहे. मानवाचे आरोग्य चांगले राहणे ही काळाची गरज आहे. कारण की एक व्यक्ती आजारी तर कुटुंब आजारी, कुटुंब आजारी तर समाज आजार आणि समाज आजारी तर तो देश आजारी अशी हि शृंखला आहे. ह्यासााठी शारीरिक हालचाल, शारीरिकदृष्या, वर्क आऊट करणे गरजेचे आहे.

इंटरनेट आल्यामुळे जशी मानवाची सोय झाली आहे तशीच ती गैरसोयीची सुद्धा झाली आहे. इंटरनेट मुळे आपण जगाशी जोडल्या गेलो आहे. दिवस रात्र एक झाली आहे. त्यामुळे रात्रीचे जॉब वाढले आहेत. ह्यामुळे झोप होत नाही आहे. सकाळी उशिरा उठल्या जाते ह्याचा परिणाम आरोग्यावर झाला आहे. आपण आपले आरोग्य हरवून बसलो आहे.


आपले आरोग्य चांगले करण्यासाठी आपली जीवनशैली आपल्या देशा सारखी करणे गरजेची आहे. फास्ट फूडला नकार द्यावा लागेल. नियमित झोप, व्यायाम व चांगले खाण्यापिण्यावर संतुलित आहारावर लक्ष्य देणे गरजेचे आहे. कुठल्याही व्यसनाला नाही म्हणावे लागेल. तरच आपण आपले चांगले आरोग्य राखू शकतो. जागतिक आरोग्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**–अरविंद मोरे, नवीन पनवेल**

# बहुआयामी व्यक्तिमत्व राजा बढे

संपादक, अभिनेते, गद्य लेखक, नाटककार, कादंबरीकार, मराठी कवी आणि गीतकार असे बहुआयामी व्यक्तिमत्व म्हणून राजा बढे यांची ओळख होती. त्यांच्या 'जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा' या गीताला राज्य गीताचा दर्जा मिळाला आहे.

राजा नीळकंठ बढे यांचा जन्म नागपुरात १ फेब्रुवारी १९१२ रोजी झाला. प्राथमिक शिक्षण छिंदवाडा येथे, तर माध्यमिक शिक्षण नागपूरच्या टिळक विद्यालयात झाले. त्यांनी मराठीतील नावाजलेल्या विविध वृत्तपत्रांमध्ये विविध ठिकाणी नोकरी केली. नियतकालिके व साप्ताहिकांमध्येही लेखन केले. कोंडिबा' या टोपणनावाने त्यांनी राजकीय वात्रटीका लिहिल्या. त्यांचा संस्कृत काव्य आणि उर्दू शायरीचा चांगला अभ्यास होता. गीत, गझलबरोबरच चारोळीमध्येही त्यांनी रचना केल्या.



बढे यांनी १९४० च्या सुमारास सिरको फिल्म्सच्या माध्यमातून चित्रपट व्यवसायात प्रवेश केला. दोन वर्षे तेथे त्यांनी काम केले. १९४२ मध्ये ते प्रकाश स्टुडिओत रूजू झाले. त्यांनी रामराज्य चित्रपटाची गाणी लिहिली. महेश कौल यांच्यासोबत अंगुरी चित्रपटात काम केले. धाडिले राम तिने का वनी या नाटकासाठी त्यांनी अभिरामा सुखधामा हे भैरवी रागातील नाट्यगीत लिहिले व पंडित जितेंद्र अभिषेकी यांनी ते गायले. आपल्या बंधूंच्या साहाय्याने स्वानंदचित्र ही चित्रपट संस्था स्थापली.

छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित रायगडचा राजबंदी हा चित्रपट बढे यांनी काढला. याच चित्रपटासाठी त्यांनी रचलेले उधं गं अंबे उधं हे लोकगीत शाहीर पिलाजीराव सरनाईक यांनी गायले. आकाशवाणीवर निर्माता म्हणून १९५६ ते १९६२ या कालखंडात त्यांनी काम केले. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर एक चित्रपट निर्माण केला. त्यांच्या कवितांवर स्वातंत्र्यवीर सावरकरांचा प्रभाव दिसतो. क्रांतिमाला या संग्रहात देशभक्तिपर २१कविता आहेत. त्यांच्या साहित्य संपदेमध्ये १८ काव्यसंग्रह, चार नाटके, नऊ संगीतिका, पाच एकांकिका, एक कादंबरी यांचा समावेश आहे. महाराष्ट्राचा प्राचीन राजा हाल सातवाहन ह्याच्या काव्यांचे संकलन असलेल्या गाथा सप्तशतीचा मराठी अनुवाद त्यांनी केला.नागपुराती महाल परिसरात त्यांचे निवासस्थान होते. त्यांचे ७ एप्रिल १९७७ रोजी निधन झाले. महापालिकेने तेथे त्यांचे स्मारक बांधले. (साभार : इंटरनेट)

## बदलते तंत्रज्ञान

# सुझुकी बर्गमन स्ट्रीट २०२६ भारतात लॉन्च

सुझुकीने आपल्या लोकप्रिय मॅक्सी–स्कूटर बर्गमन स्ट्रीटचे २०२६ मॉडेल लॉन्च केले आहे. कंपनीने ते नवीन प्लॅटफॉर्म, प्रगत वैशिष्ट्ये आणि डिझाइनमधील बदलांसह सादर केले आहे.



टीएफटी व्हेरिएंटमध्ये ड्युअल–टोन रंग मिळतील, तर एलसीडी व्हेरिएंट सिंगल–टोन रंगात येईल.

दिल्लीत याची सुरुवातीची एक्स–शोरूम किंमत १.०२ लाख रुपये ठेवण्यात आली आहे, जी टॉप–स्पेक व्हेरिएंटसाठी १.१३ लाख रुपयांपर्यंत जाते. नवीन मॉडेलमध्ये कंपनीने ॲक्सेस १२५ च्या प्लॅटफॉर्मचा वापर केला आहे, ज्यामुळे ती आधीपेक्षा अधिक मजबूत आणि हलकी झाली आहे.

कंपनीने एलईडी हेडलाइट आणि टेल–लॅम्प सेटअपमध्ये सुधारणा केली आहे. यामुळे त्याला एक नवीन आणि स्पोर्टी लूक मिळाला आहे. सोयीसाठी, कंपनीने पेट्रोल भरण्याची जागा आता टेल–लॅम्पच्या खाली हलवली आहे, ज्यामुळे रायडरला वारंवार सीट उघडण्याची गरज भासणार नाही.नवीन बर्गमनमध्ये आता की–लेस इग्निशनची सुविधा मिळेल. यात एक मल्टीफंक्शन की–फोब देण्यात आले आहे, ज्यामुळे सीट, इंधन कॅप आणि हँडल लॉक ऑपरेट करता येतात.

स्कूटरमध्ये स्मोक्ड विंडस्क्रीन आणि मेटॅलिक फिनिश असलेले एम्बलेम दिले आहेत, जे त्याला रस्त्यावर एक वेगळी ओळख देतात. त्याचे टर्न इंडिकेटर्स देखील आता पूर्वीपेक्षा अधिक कॉम्पॅक्ट बनवले आहेत.


TFT डिस्प्ले: बर्गमनच्या टॉप व्हेरिएंट्समध्ये कंपनीने TFT डिस्प्ले दिला आहे.

LCD युनिट: इतर ट्रिम्समध्ये कंपनीने जुने LCD युनिट कायम ठेवले आहे.स्कूटरमध्ये १२४cc चे एअर–कूल्ड, फ्युएल–इंजेक्टेड इंजिन देण्यात आले आहे. हे इंजिन ८.४hp पॉवर आणि १०.२Nm टॉर्क जनरेट करते. हे CVT गिअरबॉक्सशी जोडलेले आहे.

कंपनीचा दावा आहे की, नवीन स्टार्टर क्लचमुळे आता हे स्टार्ट होताना कमी आवाज करेल. तसेच, याची ३०–६० किमी प्रति तास वेग (एक्सेलरेशन) पूर्वीपेक्षा सुधारण्यात आली आहे. यात इलेक्ट्रिक आणि किक स्टार्ट दोन्हीचा पर्याय उपलब्ध राहील.

# नामवंत मराठी साहित्यिक रणजित देसाई

प्रसिद्ध साहित्यिक रणजित देसाई यांचा आज स्मृतिदिन. त्यांचा जन्म ८ एप्रिल १९२८ रोजी झाला. प्रसिद्ध कादंबरीकार, कथालेखक, नाटककार अशी त्यांची ख्याती होती. रणजित देसाई मूळचे कोल्हापूरच्या कोवाडचे. इंग्रजी शाळेत असतानाच त्यांनी लेखनाला सुरुवात केली.



**निमित्त**

कोल्हापूरच्या 'महाद्वार' मधून त्यांनी कथालेखन करायला सुरुवात केली. इंटर नापास असलेल्या देसाई यांनी १९४७ मध्ये प्रसाद मासिकाने आयोजित केलेल्या कथास्पर्धेत भैरव ही कथा लिहिली. त्यांच्या कथेला पारितोषिक मिळाले. या पारितोषिकामुळे त्यांच्या कथालेखनाला प्रोत्साहन मिळाले. रुपमहाल, कणव, जाण, कातळ, गंधाली, कमोदिनी, आलेख, मधुमती, मोरपंखी सावल्या असे अनेक लोकप्रिय कथासंग्रह त्यांनी लिहिले. ते खूप लोकप्रिय झाले.

सामाजिक आशयाच्या ग्रामीण परिवेशातील त्यांच्या कथांमधून त्यांच्या लेखनाची खास वैशिष्ट्ये जाणवतात. खेडुतांच्या जीवनाचे चांगुलपणा मांडणार्या आकर्षक शैलीतील कथा त्यांनी लिहिल्या. बारी, माझा गाव, या प्रारंभीच्या कादंबर्यांनंतर १९६२ मध्ये थोरल्या माधवराव पेशव्यांच्या जीवनावर त्यांनी स्वामी ही कादंबरी लिहिली. या कादंबरीने त्यांना लोकप्रियतेच्या शिखरावर नेले. त्यानंतरच्या 'श्रीमान योगी' या छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर लिहिलेल्या कादंबरीने त्यांची कादंबरीकार म्हणून असलेली लोकप्रियता अधिकच वाढली. रणजीत देसाई यांना 'स्वामी' ही माधवराव पेशव्यांच्या जीवनावर ऐतिहासिक कादंबरी लिहिली. त्यातून माधवराव पेशव्यांचे आयुष्य कमी असले तरी त्यांनी त्या कालावधीतही अनेक कर्तृत्ववान माणसे निर्माण केली असे दिसून येते.

तसेच त्यावेळी पानिपतच्या तिसर्या लढाईतील पराभवामुळे मराठा साम्राज्याचा मोहर गळून गेला होता. अशा वेळी अत्यंत धैर्याने आणि हिमतीने त्यांना मराठी लोकांना मानसिक आधार देऊन मराठा साम्राज्य नव्या ताकदीने उभे केले आणि पानिपतातील पराभवाचा सूड घेतला. 'श्रीमान योगी' या कांदबरीमध्ये त्यांनी महाराजांचे जीवन आणि त्याचबरोबर हिंदवी स्वराज्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम याविषयी बारकाईने विश्लेषण केले आहे. शिवाजी महाराज एक व्यक्ती म्हणून त्यांची काय सुख दु:खे होती, यावर त्यांनी मंथन केले आहे. या कांदबरीला इतिहास अभ्यासक नरहर कुरुंदकर यांनी प्रस्तावना लिहिलेली आहे. त्यात त्यांनी शिवाजी महाराजांनी पारंपरिक विचारसरणीमध्ये बदल केला. त्यामुळे त्यांना विजय संपादन करणे शक्य झाले, यावर प्रकाशझोत टाकला आहे.

स्वामीतील माधवराव आणि त्यांची पत्नी रमा तसेच श्रीमान योगीतील शिवाजी महाराज आणि रामदास स्वामी यांच्या नात्याला देसाई यांनी वेगळी परिमाणे दिली. लक्ष्यवेध, पावनखिंड, कर्णाच्या जीवनावरील राधेय, राजा रविवर्मा अशा अनेक ऐतिहासिक, पौराणिक कादंबऱ्या लिहून देसाई यांनी या प्रकारच्या कादंबऱ्यांचे युग स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण केले. नाटके, चित्रपटांचे पटकथालेखन, लेखसंग्रहही त्यांनी लिहिले. अशा या थोर साहित्यिकाचे ६ मार्च १९९२ रोजी निधन झाले झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# फ्लिप-फ्लॉप घातल्यावर काय नुकसान होते?

स्लीपर्स आणि चप्पलमध्ये सध्या ट्रेंडमध्ये आहे ती 'फ्लिप फ्लॉप' चप्पल. बिचवेअर म्हणून तरुण मंडळींमध्ये फ्लिप–फ्लॉपची वेगळीच क्रेज आहे. पण, आता रोजच्या वापरासाठी या फ्लिप फ्लॉपचा उपयोग अनेक जण करू लागले आहेत. कार्टून्स, इमोजी, काही मजेशीर मजकूर लिहिलेले फ्लिप फ्लॉप बाजारात विविध रंगांत आणि स्टाईलमध्ये उपलबध असतात.



पण, तज्ज्ञांनी मधुमेही असलेल्यांना मात्र या फॅन्सी चप्पल घालणे टाळण्याचा सल्ला दिला आहे. मधुमेह असलेल्या लोकांनी फ्लिप–फ्लॉप किंवा ओपन टोज चप्पल घालणे टाळावे. तज्ज्ञांच्या मते, फ्लिप–फ्लॉपवर असणाऱ्या या पट्ट्या पायाच्या काही भागांवर दाब देऊ शकतात, ज्यामुळे फोड येऊ शकतात,

ज्यावर मधुमेहींमध्ये उपचार करणे कठीण असू शकते; त्यामुळे फ्लिप–फ्लॉप वापरू नये, कारण बहुतेक मधुमेहींना डायबेटिक पेरिफेरल न्यूरोपॅथी असते, ज्यामध्ये पाय सुन्न होणे किंवा मुंग्या येणे अशी लक्षणे दिसून येतात. पायाच्या पहिल्या बोटाच्या आणि दुसऱ्या बोटाच्या दरम्यानच्या पट्ट्यांमुळे घर्षण किंवा जखम होऊ शकते फ्लिप–फ्लॉपमुळे रेती आणि लहान दगड सहज आतमध्ये जातात

याव्यतिरिक्त, फ्लिप फ्लॉपमध्ये लहान बोटांना नखे येणे ही एक सामान्य गुंतागूंत आहे. कारण शरीर स्विंग फेजमध्ये असताना हे फ्लिप–फ्लॉप पकडण्याचा प्रयत्न करते असे डॉक्टर पवन सांगतात

**तर मधुमेहींनी कोणत्या प्रकारच्या चप्पल निवडाव्या किंवा घालाव्यात?**

मधुमेही असलेल्या लोकांनी टाचांच्या भागाला पट्टा असलेली चप्पल निवडावी; जो स्विंग फेज दरम्यान या फ्लोटरला जागी ठेवतो. चप्पलच्या सीमलेस इनर्स, वाईड टो बॉक्स, मऊ, टिकाऊ आतील सोल बघणे आवश्यक असते, असे डॉक्टर पवन म्हणाले आहेत.

**तज्ज्ञ असेही सुचवतात की, चांगला आधार आणि फिटिंग लेस असलेले शूज घाला**

प्रो टीप मधुमेह असलेल्या लोकांना दिवस संपत असताना शूज वापरण्याचा सल्ला दिला जातो, कारण त्या वेळी तुमचे पाय थोडे सुजण्याची शक्यता असते. असे मानले जाते की, जर त्या वेळी शूज आरामदायी असतील तर ते दिवसाच्या उर्वरित वेळेतदेखील आरामदायी राहिले पाहिजेत.चांगला सपोर्ट मिळणारे शूज खरेदी करा.

# वेठबिगारीच्या जोखडातून मुलांची मुक्तता

## म्हसळा पोलिसांनी तपासचक्र फिरवत पुण्यातील वीटभट्टीवरून केली सुटका

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

पुणे जिल्ह्यातील एका वीटभट्टी मालकाच्या तावडीतून रायगड पोलिसांनी चार अल्पवयीन मुलांची सुखरूप मुक्तता केली आहे. म्हसळा पोलिसांनी तातडीने चक्र फिरवत ही धडाकेबाज कारवाई केली.

म्हसळा तालुक्यातील तोराडी येथील रहिवासी प्रकाश किसन वाघमारे आणि त्यांची पत्नी सुनीता वाघमारे हे आपल्या चार मुलांसह पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील नांदे येथील नामदेव रानवडे यांच्या वीटभट्टीवर कामासाठी गेले होते.

काम करत असताना मालक नामदेव रानवडे याने वाघमारे दाम्पत्य पळून जाऊ नये या उद्देशाने त्यांच्या चार मुलांना वीटभट्टीवर अडवून ठेवले होते. मालकाच्या सततच्या जाचाला कंटाळून हे दाम्पत्य नाईलाजास्तव आपल्या मुलांना तिथेच सोडून गावी पळून आले होते.



या घटनेची माहिती मिळताच रायगड पोलीस अधीक्षक आँचल दलाल आणि अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे यांच्या मार्गदर्शनाखाली म्हसळा पोलिसांनी त्वरित तपासाची चक्रे फिरवली. सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने क्षणाचाही विलंब न करता पुणे जिल्ह्यातील संबंधित ठिकाणी धाव घेतली.

पोलिसांनी तेथून ९ ते १५ वर्षे वयोगटातील चारही मुलांची सुटका करून त्यांना आई सुनीता वाघमारे यांच्या स्वाधीन केले. मुक्त करण्यात आलेल्यांमध्ये सुरज प्रकाश वाघमारे (१५ वर्षे) राहुल प्रकाश वाघमारे (१३ वर्षे) , मनोज प्रकाश वाघमारे (११ वर्षे), अश्विनी प्रकाश वाघमारे (९ वर्षे) यांचा समावेश आहे.मुलांना पाहूनआई,वडिलांच्या डोळ्यातून आनंदाच्या धारा वाहू लागल्या. पोलिसांनी वीटभट्टी मालक नामदेव रानवडे याला ताब्यात घेतले असून त्याच्यावर पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

नागरिकांना पोलीस प्रशासनाचे आवाहन या घटनेच्या पार्श्वभूमीवर रायगड पोलिसांनी स्थलांतरित होणाऱ्या कुटुंबांना काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेतः रोजगारासाठी जिल्ह्याबाहेर जाताना ग्रामपंचायत किंवा पोलीस पाटील यांच्याकडे कुटुंबाची नोंदणी करा.

कामावर जाताना आधारकार्ड सोबत ठेवा आणि मालक किंवा मुकादमाचा पूर्ण पत्ता व फोन नंबर नातेवाईकांना द्या,मुलांना कामाच्या ठिकाणी नेण्याऐवजी शासनाच्या हंगामी वसतिगृहात ठेवण्याचा प्रयत्न करा. अन्यायाविरुद्ध आवाज उठवाः पगार रोखणे, मारहाण करणे किंवा ओलीस ठेवणे हा वेठबिगारी अंतर्गत गुन्हा आहे. अशा वेळी घाबरून न जाता १००, ११२ किंवा चाईल्ड हेल्पलाईन १०९८ वर संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

# खोपोलीत भाजप स्थापना दिनाचा जोरदार उत्साह

**खोपोली : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिना निमित्ताने आज खोपोलीत पक्षाच्या कार्यकर्त्यांनी घोषणा जोरदार. देण्यात आल्या. त्याचवेळी कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करीत मिठाईचे वाटप केले.

भारतीय जनता पक्षाचा स्थापना दिन ६ एप्रिल रोजी असल्याने आज खोपोली शहर मध्यवर्ती कार्यालयाबाहेर कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करीत, पक्षाच्या जयकारच्या जोरदार घोषणा दिल्याने खोपोली बाजार पेठ दणाणून गेली.



पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयात या निमित्ताने विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी पंडित दीनदयाळ उपाध्याय व श्यमाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेस उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, शहराध्यक्ष अजय इंगुलकर, यांनी पुष्पहार घालून अभिवादन केले यानंतर माझी शहर अध्यक्ष रमेश रेटरेकर, ज्येष्ठ कार्यकर्ते मोरे, माजी नगरसेवक सूर्यकांत देशमुख, रास्व संघाचे जनकल्याण समितीचे नितीन भावे., ज्येष्ठ पत्रकार जयवंत माडपे यांनी भारतीय जनता पक्षाच्या स्थापनेपासूनचा इतिहास संक्षिप्तपणे सांगितला, याच वेळी उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना स्थापना दिनानिमित्त शुभेच्छा देऊन कार्यकर्त्यांनी पक्ष संघटना वाढीसाठी प्रयत्न करावे अशी सूचना केली. त्यानंतर कार्यकर्त्यांनी पक्ष कार्यालय बाहेर फटाक्यांची आतषबाजी करीत, कार्यकर्त्यांना लाडू वाटप केले.

# राजेंद्र कुडेकर जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित



**तळा : प्रतिनिधी**

कुंभार समाज सामाजिक संस्था जिल्हा रायगड च्या माणगाव येथे झालेल्या चौथ्या वर्धापन दिन व पुरस्कार वितरण सोहळ्यात रमाकांत क्षिरसागर यांचे अध्यक्षते खाली झालेल्या कार्यक्रमात तळा तालुक्यातील राजेंद्र कृष्णा कुडेकर यांना राज्याचे संस्थापक अध्यक्ष सतिष दरेकर यांच्या हस्ते जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

यावेळी समाजाचे जिल्हा अध्यक्ष अनंत महाडकर, सचिव रामदास साळवी व समाजाचे पदाधिकारी,समाजबांधव मोठ्याप्रमाणात उपस्थित होते.राजेंद्र कुडेकर यांनी कुंभार समाजाच्या तालुका अध्यक्ष पदाचा कार्यभार सांभाळले होते .त्यावेळी समाजाचा शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक दृष्टीने विविध उपक्रम राबवून सामाजिक विकास साधण्यासाठी प्रयत्न केला होता.त्यांना सामजिक विकासासाठी केलेल्या कामामुळे हा पुरस्कार मिळण्यास साह्यभूत ठरला आहे.

# खोपोलीतील रांगोळी स्पर्धेत श्रावणी पाटील प्रथम

**खोपोली : प्रतिनिधी**

स्व. यशवंत गायकवाड फाउंडेशनच्यावतीने मुली व महिलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या रांगोळी स्पर्धेत महिलांमध्ये १)श्रावणी रोशन पाटील यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला.२) मयुरी दळवी ३) सविता मधुकर शेलवले उत्तेजनार्थ मीनल संतोष गायकरगार्गी संदीप चाळेकर आणि रितू जयवंत कोळी यांना विशेष पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले.परीक्षक म्हणून सी एस गायकवाड आणि एच.एम.राहिंज यांनी काम पाहिले. मुली व महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी फाउंडेशन च्या वतीने हा उपक्रम सुरू करण्यात आल्याचे नगरसेवक राहुल गायकवाड यांनी सांगितले.


## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**शहर अभियंता विभाग**

**ई-निविदा सूचना**

जा.क्र. पमपा/बांधकाम/६५२५/प.क्र.२२५,२१५/९९७/२०२६ दिनांक : ०६/०४/२०२६

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/ निम शासकीय (Central Government/State Government/ Government Under Taking) विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पद्धतीनुसार ई-निविदा मागवित आहेत.

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/२९०/ २०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - अ, प्रभाग क्र.११, कामोठे, सेक्टर-०९ मधील अंतर्गत रस्त्यातील नादुरुस्त फुटपाथची दुरुस्ती करणे. | ४७,८४,५९१/- |
| २. | PMC/CE/२८९/ २०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - क, प्रभाग क्र.११,१२ कामोठे, सेक्टर-२० मधील अंतर्गत रस्त्यातील फुटपाथवर स्टॅम्प काँक्रीट करणे. | ५७,३७,४०५/- |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या 'https://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. ००/००/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त -।**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीव्दारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **७ दिवसाच्या** आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे-वावंजे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड.**

| गट क्रमांक/ उपविभाग नंबर | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. | नाव |
|---|---|---|---|
| २३/२ | ०-१०-४०<br>पो.ख. ०-०४-००<br>**एकूण : ०-१४-४०** | १.५० | श्री. बळीराम पदु पाटील |

पनवेल.
दिनांक : ०६/०४/२०२६

**सही /**
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
ॲडव्होकेट

शॉप नं. 13, वरद विनायक कॉम्पेक्स, प्लॉट नंबर 4, सेक्टर नंबर 5, गुरूद्वारा समोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. मो. नं. 9022317772.

## सावधान नोटीस

तमाम जनतेस या सावधान नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे अशील सौ. रोहीणी अर्जुन पाटील राहणार. नेरे गाव, ता.पनवेल, जि. रायगड. ह्यांची वडिलोपार्जित व एकत्र कुटूबांची खालील वर्णनाची जमीन मिळकत आहे.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे. मोहो, ता. पनवेल, जि. रायगड.**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|---|
| मोहो | २९ | २ | १-३५-००<br>०-०५-०० | २५.८१ |

सदरची जमीन मिळकत ही आमचे अशील व १) श्री. खंडू बाळु फडके, २) जनाबाई नामदेव पाटील ३) लिलाबाई सदानंद म्हात्रे यांची एकत्र कुटूबांची जमीन मिळकत असून सदर जमिनीचे अद्यापपर्यंत वाटप झालेले नाही. असे असताना श्री. खंडू बाळु फडके... वगैरे ह्यांनी सदरची जमीन मिळकत आमचे अशिलांच्या नकळत त्रयस्थ इसमांना विकण्याच्या खटपटीत असल्याचे आमचे अशिलांना खात्रीशीर समजलेले आहे. सबब आमचे अशिलांनी वरील जमिनीच्या वाटपाकारीता, ठरावाकरीता तसेच मनाई हुकूमासाठी पनवेल कोर्टामध्ये रे. मु. नं. ३६६/२०२५ हा दावा दाखल केलेला आहे. श्री. खंडू बाळु फडके.... वगैरे सदरची जमीन विक्री करीत असल्याने सदर विक्रीस, व्यवहारास आमचे अशिलांची सक्त हरकत आहे. सबब ह्या सावधान नोटीसीस कारण घडलेले आहे.

ह्या नोटीसीने तमाम जनतेस असे कळविण्यात येते की, सदर जमिनीमध्ये आमचे अशिलांचा अविभाज्य हिस्सा असल्याने सदरचा हिस्सा निर्तुटक करून मिळणेकरीता वाटपाकरीता तसेच मनाई हुकूमाकरीता दावा प्रलंबित असल्याने श्री. खंडू बाळु फडके.... वगैरे ह्यांच्यासोबत कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये. तसे केल्यास सदरचा व्यवहार बेकायदेशीर ठरेल व होणाऱ्या परिणामास संबंधितांना जबाबदार धरण्यात येईल ह्याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे सावधान नोटीस दिली.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ६/0४/२०२६

**सही/-**
**ॲड. समिर राम कुंभार**

रा. पालेखुर्द, पो. देवीचापाडा, तळोजा एम.आय.डी.सी., ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०८ मो.नं. ९००४४०२३३०

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की **मौजे आंबिवली,** तहसील-पनवेल, जिल्हा-रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार **श्रीमती सरीता अनंता गडकरी व इतर,** यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :-

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे आंबिवली,** तहसील पनवेल, जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र: लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र: पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र: एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| ९/२/ब/१ | २ | ०-२६-३० | ०-०७-१० | ०-३३-४० | २.५६ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन **७** दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०६/०४/२०२६

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए.एल.एल.बी.

**कार्यालयीन पत्ता :** गाळा क्र. १५४ महानगरपालिका कॉम्प्लेक्स, तहसीलदार ऑफिसजवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६. संपर्क:- ८८८८२७१७५९

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की **मौजे आंबिवली,** तहसील-पनवेल, जिल्हा-रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार **श्रीमती जयश्री अनंता गडकरी व इतर,** यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :-

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे आंबिवली,** तहसील पनवेल, जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र: लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र: पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र: एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| ९/१२/५ | २ | ०-५०-०० | ०-००-०० | ०-५०-०० | ६.०० |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन **७** दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०६/०४/२०२६

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए.एल.एल.बी.

**कार्यालयीन पत्ता :** गाळा क्र. १५४ महानगरपालिका कॉम्प्लेक्स, तहसीलदार ऑफिसजवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६. संपर्क:- ८८८८२७१७५९

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**मुदतवाढ सूचना क्र. २**

**ई निविदा सूचना क्र. ८६/२०२५-२०२६ (मुंबई) करीता**

दिनांक १६/०३/२०२६ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक फ्रिप्रेस जरनल, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा उपलब्धता, कंत्राटदारांचे प्रश्न, कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्धते बाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती... पावसाळ्यापूर्वी व पावसाळ्यानंतर नाले व रस्त्याच्या कडील गटारांची साफसफाई तसेच इंजिनिअरिंग झोनमधील बांधकाम केलेल्या गटारांची यांत्रिक पद्धतीने साफसफाई व अनुषंगिक कामे करणे. | ₹ २,३१,१८,२४२.०० |
| २. | रोहा औद्योगिक क्षेत्रातील सामायिक सांडपाणी केंद्रा मधील वापरात नसलेल्या सिमेंट कॉंक्रेटच्या यु ए एसबी टाकीची दुरुस्ती व मजबुतीकरण करून सांडपाणी साठविण्याकरिता उपयोगात आणणे तसेच कंपाऊंड भिंतीचे बांधकाम करणे. | ₹ ३,६२,४५,०१०.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र ०७/०४/२०२६ ते २१/०४/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १०/०४/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १५/०४/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# मुलीची छेड काढणाऱ्याला अटक



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रबाळे पोलीस ठाणे, नवी मुंबई हद्दीत अल्पवयीन मुलीची छेड काढणाऱ्या विकृत आरोपीस अटक करून गुन्हा उघडकीस आणण्यात आला आहे. ४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी सुमारे ८:३५ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी रस्त्याने पायी जात असताना आरोपीने तिच्या मागून येऊन पाय मारत तिचे नाव विचारून तिच्याशी अश्लील कृत्य केले.

या घटनेप्रकरणी गु.र.क्र. २९३/२०२६ प्रमाणे BNS कलम ७४ तसेच POCSO कलम ८ व १२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत, पो.नि. (प्रशासन) बनसोडे व पो.नि. (गुन्हे) सचिन गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. गुन्हे प्रकटीकरण अधिकारी सहा.पो.नि. दिपक खरात व त्यांच्या पथकाने घटनास्थळाचे बारकाईने निरीक्षण करून परिसरातील CCTV फुटेज तपासले तसेच तांत्रिक विश्लेषण व बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपीचा शोध घेण्यात आला.

तपासादरम्यान मिळालेल्या ठोस माहितीच्या आधारे आरोपीस ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली असता त्याचा सदर गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न झाला. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव विवेक गजानन कदम (वय ३५ वर्ष, धंदा ऑफिस बॉय, रा. घणसोली, नवी मुंबई) असे असून त्यास पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी अटक करण्यात आलेली आहे. सदर कारवाई सहा. पोलीस निरीक्षक दिपक खरात तसेच त्यांच्या पथकातील पोलीस अंमलदार दर्शन कटके, मयूर सोनवणे, गणेश वीर, धनाजी भांगरे, यादवराव घुले व मनोज देडे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

# अमृत भारत एक्सप्रेसमुळे पनवेलमध्ये प्रवाशांची गर्दी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल रेल्वेस्थानकात सोमवारी सकाळपासून तिकिट काऊंटर आणि फलाट परिसरात प्रवाशांची मोठी गर्दी उसळत असून पनवेल–अलीपुरद्वार अमृत भारत एक्सप्रेस या विशेष गाडीत जागा मिळवण्यासाठी प्रवाशांची झुंबड उडत आहे. या वाढत्या गर्दीचे नियोजन करण्याची मागणी नियमित प्रवाशांकडून होत आहे.



पनवेल स्थानकातून दर आठवड्याला सोमवारी सकाळी ११.५० वाजता सुटणारी गाडी क्रमांक ११०३१ पनवेल–अलीपुरद्वार अमृत भारत एक्सप्रेस (पश्चिम बंगाल, आसाम) ही परप्रांतीय मजुरांसाठी महत्त्वाची ठरत आहे.

२३ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या या गाडीत ११ जनरल आणि आठ स्लीपर डबे असून या गाडीसाठी पहाटेपासूनच तिकीट काऊंटरवर लांबच लांब रांगा लागतात. सध्या स्थानकाच्या विकासकामांमुळे तिकीट काऊंटरमार्गेच प्रवेशासाठी एकच मार्ग उपलब्ध असल्याने प्रवाशांची अधिकच गैरसोय होत आहे. मोठ्या प्रमाणावर परराज्यात जाणारे मजूर तिकीटासाठी रांगेत उभे राहत असल्याने इतर एक्सेप्रेस आणि लोकलच्या प्रवाशांनाही त्रास सहन करावा लागत आहे.

रेल्वे प्रशासनाने सहा तिकीट काऊंटर आणि सुमारे १५ स्वयंचलित मशीन उपलब्ध करून दिली असली तरी गर्दी नियंत्रणात येत नाही.

पनवेल हे भविष्यात महत्वाचे रेल्वे टर्मिनल होत आहे. प्रत्येक दिवसाला अशा दोन ते तीन गाड्या पनवेल स्थानकातून सुटल्यास या गर्दीचा ताण स्थानकावर पडेल. रेल्वे नियोजन विभागाने याचे भान ठेवूनच पुढील नियोजन करावे, अशी मागणी प्रवासीवर्गाकडून होत आहे.

# नेरूळ-जुईनगरदरम्यान ओव्हरहेड वायरमध्ये बिघाड

## अप मार्गावरील रेल्वेसेवा ठप्प, प्रवाशांचे हाल

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

हार्बर मार्गावरील नेरूळ आणि जुईनगर स्थानकांदरम्यान रविवारी रात्री ओव्हरहेड वायर (ओएचई) मध्ये गंभीर तांत्रिक बिघाड झाल्याने रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली. रात्री सुमारे ८.०६ वाजता किमी ३३/२२१ दरम्यान कॅटेनरीची तार तुटल्याची घटना घडली असून, यामुळे अप मार्गावरील सेवा पूर्णपणे ठप्प झाली आहे.

रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, कॅटेनरी वायर तुटल्याने संबंधित विभागातील वीजपुरवठा तातडीने बंद करण्यात आला. सुरक्षेच्या दृष्टीने पॅन्टोग्राफ खाली घेण्यात आले असून पीएल–



१५६ आणि पीएल–१५८ या विभागांमध्ये ओएचई पुरवठा बंद ठेवण्यात आला आहे.

एसडब्ल्यूडी ते जुईनगरदरम्यान अप लाईनवर विद्युत पुरवठा खंडित झाल्याने गाड्या पुढे जाऊ शकत नसल्याने वाहतूक पूर्णपणे खोळंबली. या बिघाडाचा सर्वाधिक फटका कामावरून परतणाऱ्या प्रवाशांना बसला. अनेक गाड्या मधल्या स्थानकांदरम्यान थांबवाव्या लागल्या, तर काही गाड्या उशिराने धावत असल्याने स्थानकांवर प्रचंड गर्दी झाली. प्रवाशांना उशीर, गोंधळ आणि गैरसोयीला सामोरे जावे लागले.

घटनेची माहिती मिळताच ओएचई विभागाचे कर्मचारी तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. शिडीच्या साहाय्याने तुटलेली कॅटेनरी वायर दुरुस्त करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. मात्र, तांत्रिक काम जटिल असल्याने सेवा पूर्णपणे पूर्ववत होण्यासाठी काही काळ लागण्याची शक्यता अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, रेल्वे प्रशासनाकडून प्रवाशांना संयम बाळगण्याचे आवाहन करण्यात आले असून, शक्य असल्यास पर्यायी प्रवास व्यवस्था वापरण्याचा सल्ला देण्यात आला आहे. हार्बर मार्गावरील सेवा पूर्ववत करण्यासाठी सर्व यंत्रणा कार्यरत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

# मंत्रालयीन लाचखोर अधिकारी पोलिसांच्या जाळ्यात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मंत्रालयातील अर्थ व नियोजन विभागात कार्यरत कक्ष अधिकारी विलास ज्ञानोबा लाड यांना सहा लाख ३७ हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने खारघर येथे रंगेहाथ पकडले. शासकीय निधी मंजूर करून देण्याच्या मोबदल्यात ही लाच मागितल्याचे निष्पन्न झाल्याने ही कारवाई करण्यात आली असून, या घटनेमुळे मंत्रालयातील भ्रष्टाचार पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

लाड हे मंत्रालयात वर्ग–१ कक्ष अधिकारी म्हणून कार्यरत असून, तक्रारदाराच्या गावातील मूलभूत सुविधा विकास कामांसाठी २५/१५ व अल्पसंख्याक योजनेंतर्गत शासकीय निधी मंजूर करून देण्यासाठी त्यांनी ६,३७,००० रुपयांची लाच मागितली होती. संबंधित गावाच्या सरपंचांनी तक्रारदाराला अधिकारपत्र दिल्याने तो निधी मंजुरीसाठी मंत्रालयात वारंवार ये–जा करत होता.तक्रारदाराला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्याने ९ मार्च रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली.

त्यानंतर १६ मार्च रोजी पडताळणी करण्यात आली असता लाड यांनी लाच मागितल्याचे स्पष्ट झाले. यानुसार रविवारी (ता.५ एप्रिल) रोजी खारघर येथे सापळा रचण्यात आला. या कारवाईदरम्यान लाड यांना तक्रारदाराकडून ६,३७,००० रुपयांची लाच स्वीकारताना पकडण्यात आले.या प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ च्या कलम ७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक प्रमोद सुर्वे यांच्या पथकाने, पर्यवेक्षक अधिकारी सागर आरगडे यांच्या मार्गदर्शनाखाली केली.

दरम्यान, फेब्रुवारी महिन्यात मंत्रालयातील अन्न व औषध प्रशासन विभागातील लिपीकाच्या लाच प्रकरणानंतर पुन्हा एकदा मंत्रालयातील अधिकाऱ्यावर कारवाई झाल्याने प्रशासनातील भ्रष्टाचाराविरोधात कठोर भूमिका घेतली जात असल्याची चर्चा आहे. मागील वर्षीही सिडको डळातील लाचखोरीवर पोलिसांनी जोरदार कारवाई केली.

# नेरूळ येथे महापालिकेने कार्यान्वित केलेले बेंच गायब



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई परिवहन उपक्रमाने बस थांब्यावर प्रवाश्यांना बसची वाट पाहताना ताटकळत उभे राहू नये, म्हणून बसण्यास बेंचेस बसलविले आहेत, मात्र नेरूळ मध्ये बसवलेले लोखंडी बेंच गायब केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

पालिकेच्या परिवहन उपक्रमा कडून प्रवाश्याना त्रास होऊ नये, म्हणून बस सेल्टर उभारला जातो. त्या ठिकाणी प्रवाश्यांना बसण्याची सोय केली जाते.जेणेकरून बसची वाट पाहता पाहता उभे राहून कंटाळा येऊ नये. उन्हाळा,पावसाळ्याचा त्रास प्रवाश्यांना होऊ नये हा या मागील मूळ उद्देश असतो मात्र नेरूळ सेक्टर ८ मधील समाधान बस थांबा येथील लोखंडी बेंच मागील आठवड्यापासून गायब असल्याचे दिसून येते.

नवी मुंबई महापालिकेच्या हद्दीतील सार्वजनिक ठिकाणी, पदपथ, वनराई, उद्यान, नागरी वस्ती, मंदिर शेजारी तसेच जिथे नागरिकांची रेलचेल असेल अशा ठिकाणी बेंच बसविले जातात, परंतु हेच बेंच आता गायब होऊ लागल्याच्या घटना समोर येत आहेत.

# राष्ट्रीय निबंध स्पर्धेत बीसीटी विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीचे यश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कौशल्य विकास संस्थेने २ एप्रिल २०२६ रोजी मुंबईतील विद्याविहार (पूर्व) येथील के. जे. सोमैया विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात "माझे स्वप्नवत अर्थसंकल्प २०२६"या अखिल भारतीय राष्ट्रीय निबंध स्पर्धेचा भव्य पुरस्कार सोहळा आयोजित केला.

या स्पर्धेत देशभरातील विद्यार्थ्यांनी भारताच्या भावी अर्थसंकल्प आणि आर्थिक विकासावर आपल्या नाविन्यपूर्ण कल्पना सादर केल्या. भागूबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयाची विद्यार्थिनी रिया शुक्ला हिने राष्ट्रीय स्तरावर दुसरा क्रमांक पटकावला. तिच्या निबंधातील मौलिकता आणि दूरदृष्टीचे विशेष कौतुक झाले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे पांडुरंग जाधव यांची उपस्थिती लाभली, ज्यांनी विद्यार्थ्यांना विचारपूर्वक धोरणात्मक कल्पनांद्वारे राष्ट्र उभारणीत सक्रियपणे योगदान देण्यास प्रोत्साहित केले.

# ऐरोलीतील साखळीचोरांना अटक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

ऐरोली परिसरात पहाटे बाहेर जाणाऱ्या महिलांना लक्ष्य करत साखळी चोरी करणाऱ्या टोळीचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला असून रबाळे पोलिसांनी या प्रकरणी तीन गुन्ह्यांतील तीन आरोपींना अटक केली आहे. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत या टोळीचा पर्दाफाश केला.

रबाळे पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,बाळकृष्ण सावंत, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सचिन गवळी, पोलीस निरीक्षक (प्रशासन), शाम बनसोडे यांचे सुचनांप्रमाणे तपास पथकामधील पोउपनि / राहुल गरड व पोहवा / १०२ भोसले, पोहवा/२३३० वायंगणकर, पोना/३४४७ करंकाळ, पोशि/३२५२ साळुंखे, पोशि/ ३८९७ राळे, पोशि/३२०४ तडवी यांनी नमुद गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवुन तेथील परिस्थितीचा बारकाईने अभ्यास केला घटनास्थळी असलेले सीसीटिव्ही कॅमेरे चेक करून आरोपीचे फुटेज प्राप्त केले.

तांत्रिक तपासाद्वारे तसेच घणसोली, कोपरखैरणे, वाशी, मानखुर्द, चेंबुर, गोवंडी, शिवाजीनगर, छेडानगर, घाटकोपर येथिल जवळपास १२० ते १३० सीसीटीव्ही कॅमेरांची तपासणी करून आरोपींची नावे निष्पन्न करून अटक आरोपीत यांचेकडे कौशल्यपुर्ण तपास करून जबरीने चोरलेले सोनसाखळी व गुन्हयात वापरलेले हत्यार व मोटरसायकल हस्तगत करण्यात आले आहे.

# स्वर आणि संगीतातून डॉ. बाबासाहेबांना आदरांजली



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नव्या पिढीपर्यंत बाबासाहेबांचे प्रेरणादायी विचार पोहचण्यासाठी आम्ही युवकांना आवडेल अशा गीतसंगीतातून बाबासाहेब मांडले. नव्या पिढीने जुनी गाणी ऐकावीत व समजून घ्यावीत याकरिता ती नवीन सुरावटींमध्ये गुंफली. स्वर आणि संगीतातून एखादी गोष्ट चांगल्या पध्दतीने सांगता येते व समोरच्याला पटकन समजते कारण त्यात भावना असतात अशा शब्दात श्रोत्यांशी सुसंवाद साधत रसिका आणि कृतिका या बोरकर सिस्टर्सनी मनात खोलवर रुजलेले व स्वरांमधून उमललेले बाबासाहेबांचे तत्वज्ञान ठामपणे मांडले.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवानिमित्त ऐरोली से.१५ येथील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारकात नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने ३ ते १३ एप्रिल या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या 'जागर २०२६' या व्याख्यानमालेमध्ये सुप्रसिध्द गायिका रसिका व कृतिका बोरकर आणि गिटारिस्ट नयन बोरकर यांच्याशी पत्रकार विनोद राऊत यांनी दिलखुलास सुसंवाद साधला.

यावेळी समाजकल्याण व झोपडपट्टी सुधार समितीच्या सभापती रंजना सोनवणे, परिवहन समिती सदस्य यशपाल ओव्हाळ, शिक्षण व बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या विभागप्रमुख उपायुक्त संघरत्ना खिल्लारे, लेट्स रिड फाऊंडेशनचे प्रमुख लेखक– उद्योजक प्रफुल्ल वानखेडे आणि श्रोते मोठया संख्येने उपस्थित होते.

वयाच्या तिसऱ्या वर्षापासून वडीलांकडून गायनाचे धडे मिळाले, कुटुंबातून प्रोत्साहन मिळाले व बाबासाहेबांची आणि बुध्दांची गाणी ऐकत ऐकत, त्यांचे विचार समजून घेत मोठे झालो असे सांगत शिक्षणासाठी कुटुंबापासून दूर मुंबईत आलो आणि मुंबईने गायन क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी आपुलकीचा आधार दिला, अशा शब्दांत त्यांनी आपला प्रवास सांगितला.

बाबासाहेबांचे लिखाण वाचण्यासाठी बुध्दीमत्ता लागते त्यामुळे आधी महात्मा फुले यांची पुस्तके वाचावीत व पुढे बाबासाहेबांची पुस्तके वाचनाकडे वळावे असा प्रेमळ सल्लाही त्यांनी दिला. बाबासाहेबांकडे जीवनाला योग्य दिशा देणारे 'समुपदेशक' म्हणून बघतो व ते 'स्टाईल आयकॉन' आहेत अशा शब्दात रसिका बोरकर यांनी डॉ. बाबासाहेबांची आपल्या मनातली प्रतिमा मांडली.

कृतिका बोरकर यांनी बाबासाहेबांचे समाज उध्दारक विचार सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहचविण्यासाठी लोकसंगीताचा मोठा वाटा असल्याचे सांगत बाबासाहेब स्वतः आवडीने तबला, व्हॉयलिन वाजविणारे 'ग्रेट म्युझिशियन होते' अशी वेगळी ओळख सांगितली. शास्त्रीय संगीत हे विपश्यना आणि ध्यानासाठी पूरक असल्याचे मत व्यक्त करीत शास्त्रीय संगीतातील ख्याल म्हणजे खयाल अर्थात विचार असल्याचे त्यांनी सांगितले. बौध्द धर्मात ध्यानाला अर्थात शांतीला महत्व असून स्तूपात, बौध्द लेण्यांमध्ये जाऊन बुध्दवंदना घ्यावी असेही त्या म्हणाल्या.

१३ एप्रिलपर्यंत चालणाऱ्या 'जागर' व्याख्यानमालेत ६ एप्रिल रोजी चळवळीतील प्रसिध्द लोकशाहीर संभाजी भगत 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची सांस्कृतिक दृष्टी' या विषयावर श्रोत्यांशी संवाद साधणार असून ८ एप्रिल रोजी ज्येष्ठ संपादक व लेखक श्री. श्रीकांत बोजेवार हे 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर : गंभीर आणि दिलखुलास' या विषयावरील व्याखानातून बाबासाहेबांच्या व्यक्तीमत्वातील वेगळे पैलू उलगडणार आहेत.

# राज्यस्तरीय मूट कोर्ट स्पर्धेचा यशस्वी समारोप

**पनवेल : वार्ताहर**

छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ, पनवेल यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली राज्यस्तरीय मूट कोर्ट स्पर्धा 'न्याय विमर्श २०२६' अत्यंत यशस्वीरीत्या पार पडली. राज्यातील विविध प्रतिष्ठित विधी महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वकिली कौशल्य, कायदेशीर विश्लेषण आणि लेखन क्षमता यांचे उच्च दर्जाचे सादरीकरण केले.

स्पर्धेची प्राथमिक फेरी ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आली होती. या फेरीत एकूण १६ संघांनी सहभाग घेतला. आभासी स्वरूप असूनही स्पर्धेमध्ये उत्कृष्ट शैक्षणिक संवाद, प्रभावी युक्तिवाद आणि स्पर्धात्मकतेचा उच्च स्तर पाहायला मिळाला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून न्यायमूर्ती अंबादास जोशी उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शक विचारांनी सहभागी विद्यार्थ्यांना न्यायव्यवस्थेतील मूल्यांची सखोल जाणीव करून दिली. तसेच, कोल्हापूर येथील सिव्हिल जज डॉ. नितीन ए. माने यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना व्यावहारिक कायदेशीर



दृष्टिकोन प्रदान केला. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन विद्यापीठाच्या वरिष्ठ नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

कुलगुरू डॉ. केशव बढाया, उपकुलगुरू प्रा. डॉ. केशरी लाल वर्मा, निबंधक प्रा.डॉ. आर. पी. शर्मा, डीन प्रा. डॉ. एस. पी. मिश्रा तसेच विभागप्रमुख डॉ. अवनी एम. मिस्त्री यांच्या मार्गदर्शनामुळे संपूर्ण स्पर्धा शिस्तबद्ध आणि सुरळीतरीत्या पार पडली. संयोजक डॉ. पियूष महेश्वरी तसेच सह–संयोजक डॉ. पंकज द्विवेदी आणि अनन्या यादव यांच्या नियोजनबद्ध आणि समन्वयित प्रयत्नांमुळे कार्यक्रमाची गुणवत्ता अधिक वृद्धिंगत झाली. स्पर्धेत राज्यातील विविध नामांकित संस्थांचे संघ सहभागी झाले होते, ज्यामध्ये दयानंद कॉलेज ऑफ लॉ, लातूर; एनएमआयएमएस, नवी मुंबई; जितेंद्र चौहान कॉलेज ऑफ लॉ; मुंबई विद्यापीठ स्कूल ऑफ लॉ, ठाणे; अमिटी युनिव्हर्सिटी, मुंबई; विवेकानंद एज्युकेशन सोसायटी कॉलेज ऑफ लॉ, चेंबूर; भागुबाई चांगू ठाकूर कॉलेज ऑफ लॉ; के.सी. लॉ कॉलेज; टीएमव्ही लोकमान्य टिळक लॉ कॉलेज, खारघर; मराठवाडा मित्रमंडळ शंकरराव चव्हाण लॉ कॉलेज; डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ लॉ; केईएस श्री जयंतिलाल एच. पटेल लॉ कॉलेज; सरसेनापती हंबीरराव मोहिते लॉ कॉलेज तसेच ऍग्नेल स्कूल ऑफ लॉ या संस्थांचा समावेश होता.

प्राथमिक फेरीनंतर अमिटी युनिव्हर्सिटी, मुंबई; एनएमआयएमएस, नवी मुंबई; भागुबाई चांगू ठाकूर कॉलेज ऑफ लॉ आणि डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ लॉ हे चार संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरले. तर पार पडलेल्या उपांत्य आणि अंतिम फेऱ्यांमध्ये सहभागी संघांनी अत्यंत परिष्कृत, तर्कसंगत आणि प्रभावी युक्तिवाद सादर केले. अंतिम फेरीत अमिटी युनिव्हर्सिटी, मुंबई आणि एनएमआयएमएस, नवी मुंबई यांच्यात झालेली चुरशीची लढत विशेष लक्षवेधी ठरली. स्पर्धेचे परीक्षण ॲड. सागर शहाणी आणि ॲड. अश्विनी कुमार यांनी केले.

समारोप समारंभात विविध गटांतील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांचा गौरव करण्यात आला. फादर ऍग्नेल्स कॉलेज ऑफ लॉ, वाशी यांना 'सर्वोत्कृष्ट मेमोरियल' पुरस्कार प्रदान करण्यात आला. मराठवाडा मित्रमंडळ शंकरराव चव्हाण लॉ कॉलेजच्या औषुतोष बिशोयी यांना 'सर्वोत्कृष्ट संशोधक' म्हणून सन्मानित करण्यात आले. विवेकानंद एज्युकेशन सोसायटी कॉलेज ऑफ लॉ, चेंबूर येथील आशी बिंदल यांनी 'सर्वोत्कृष्ट वक्ता' हा किताब पटकावला. अमिटी युनिव्हर्सिटी, मुंबई या संघाने उपविजेतेपद प्राप्त केले, तर एनएमआयएमएस, नवी मुंबई या संघाने विजेतेपद संपादन केले.

# हनुमान जन्मोत्सव सोहळा उत्साहात

**रसायनी : प्रतिनिधी**

ब्राह्मवृंद समाजाचे श्री राम मारूती देवस्थान ट्रस्टचा परंपरेने चालत आलेला श्री राम मारूती जन्मोत्सव सोहळा १९ मार्च ते ४ एप्रिल २०२६ या कालावधीत साजरा झाला.

या कालावधीत श्री राम जन्मोत्सव, रोज सायंकाळी किर्तन सेवा, हनुमान जन्मोत्सव, धार्मिक यज्ञ, पालखी सोहळा, हळदी कुंकू, प्रसाद भोजन इत्यादी कार्यक्रम संपन्न झाले. लळीत म्हणून गम्मत जंमत या नाटकाचा ग्रामस्थांनी बसवलेला प्रयोग साजरा केला सत्यनारायणाची पूजा होऊन उत्सवांची सांगता झाली.

या सर्व कालावधीत गुळसुंदे स्थानिक ग्रामस्थ व नोकरी व्यवसायानिमित्त बाहेर गावी असणारे सर्व सभासद ग्रामस्थ उपस्थित राहतात १६८ वर्ष सातत्याने परंपरा जपत हा उत्सव होतो.

# रांजणपाड्यात आज 'देव घरा आयला' नाट्यप्रयोग

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील रांजणपाडा येथील अष्टगंध सांस्कृतिक, कला, सामाजिक मंडळाच्या वतीने मरूआईच्या यात्रेनिमित्त आणि बाबीबाई त्रिंबक पाटील यांच्या स्मृतिप्रत्यर्थ आज मंगळवारी (दि.७) रात्री दहा वाजता धनेश्वर म्हात्रे लिखित व हसूराम पाटील दिग्दर्शित तसेच प्रसाद कडू सहदिग्दर्शक 'देव घरा आयला' या दोन अंकी नाटकाचा प्रयोग रांजणपाडा (उरण) येथील हनुमान मंदिराच्या भव्य पटांगणात सादर करण्यात येणार आहे.

या नाटकाची प्रमुख निर्मिती रमेश चिंतामण कोळी यांची आहे. तर नाट्य मंडळाचे अध्यक्ष अशोक कान्हा म्हात्रे, सचिव दत्तात्रेय घरत, खजिनदार प्रज्योत पाटील, सल्लागार रंजन ठाकूर, नरेंद्र ठाकूर, पत्रकार दत्तात्रेय म्हात्रे, पत्रकार कैलासराजे घरत, बळीराम घरत, विद्याधर म्हात्रे, गजानन म्हात्रे हे नाट्यप्रयोगाचे व्यवस्थापन करणार आहेत. तर दिगंबर कोळी, मनोहर ठाकूर यांची संकल्पना आहे. नाटकात धनेश्वर म्हात्रे, हसूराम पाटील, कृष्णकांत म्हात्रे, दिगंबर कोळी, सुमित कुंभार, अशोक म्हात्रे, जयकिसन मोकल, वैभव म्हात्रे, प्रसाद कडू, अलंकार कडू, वैशाली मोहिते, परीशा सरोदे, व रुद्र ठाकूर आदी कलाकार भूमिका बजावणार आहेत.

आनंद कुबल यांचे संगीत, राजा जोशी यांचे नेपथ्य, डी. वाय. म्हात्रे यांची रंगभूषा, संतोष साऊंड सर्विस यांची रंगमंच व्यवस्था आहे. अंधश्रद्धेवर प्रकाश टाकणारे व आगरी संस्कृती, आगरी भाषेतील गोडवा, आगरी रूढी परंपरा व नातेसंबंधाच्या वास्तवावर चर्चा करायला लावणारे हे 'देव घरा आयला' नाटक रसिकांना नक्कीच भावेल अशी प्रतिक्रिया लेखक धनेश्वर म्हात्रे यांनी व्यक्त केली.

# वेताळ मूर्ती विटंबनेप्रकरणी लव्हेजकरांची पालिकेवर धडक

**खोपोली : प्रतिनिधी**

वेताळमूर्ती देवस्थान जेसीबी यंत्राने हटवल्याप्रकरणी लव्हेज ग्रामस्थ आक्रमक झाले असून, ग्रामस्थांनी सोमवारी खोपोली नगर परिषदेच्या कार्यालयावर धडक मोर्चा काढून नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांना निवेदन देत संबंधित ठेकेदाराचे काम तत्काळ थांबून त्यावर कायदेशीर कारवाई करण्याची जोरदार मागणी केली, यात महिला अग्रेसर होत्या.



खोपोली नगरपालिका हद्दीतील लव्हेज गावाजवळच्या स्टील कारखान्याच्या आवारातील अतिरिक्त जागेचे सपाटीकरण सुरू असून या जागेत वेताळ मूर्ती देवस्थान होते, ते ठेकेदाराने रात्रीच्या समयी जेसीबी यंत्राने उखडून बाजूला नेऊन ठेवले, सदरच्या घटनेने ग्रामस्थांमध्ये लाट उसळली, ग्रामस्थांनी पोलिसांना निवेदन दिले होते, त्याचप्रमाणे सोमवारी नगर परिषदेच्या कार्यालयावर ग्रामस्थांनी मोर्चा आणून नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांना संबंधित ठेकेदारावर कठोर कारवाई करावी अशी जोरदार मागणी केली. यासंबंधीचे ग्रामस्थांतर्फे त्यांना निवेदनही देण्यात आले. यावेळी मुख्याधिकारी डॉक्टर पंकज पाटील उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, नगररचना अधिकारी ठाकूर व पोलीस निरीक्षक सचिन हिरे हे उपस्थित होते.

याचदरम्यान उपस्थित ग्रामस्थांनी वेताळ देवस्थान बद्दल आपल्या भावना तीव्र असल्याचे सांगून तत्काळ संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी त्याप्रमाणे व्यवस्थापनाने देवस्थान करिता दोन गुंठे जागा सोडावी अशी आग्रहाची मागणी केली. याचवेळी सामाजिक कार्यकर्ते यशवंत साबळे व रवींद्र रोकडे यांनी चर्चेत भाग घेऊन ग्रामस्थांच्या मागणीला पाठिंबा दर्शविला.

# चारित्र्याच्या संशयावरून पत्नीची हत्या

## श्रीवर्धनच्या दिघी परिसरातील घटना; आरोपीला अटक

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील दिघी परिसरात वैवाहिक वादातून उद्भवलेल्या संशयाने एक दुर्दैवी आणि धक्कादायक वळण घेतले. पतीने पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत तिला दगडाने मारहाण केल्याने तिचा मृत्यू झाल्याची घटना १ एप्रिल रोजी दुपारी घडली. या प्रकरणी आरोपी पतीला दिघी सागरी पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार मुरूड तालुक्यातील अनिता किरण वाघमारे (वय २०) आणि तिचा पती किरण परशुराम वाघमारे (वय २५) हे दिघी येथील आंबा बागेत मजुरीचे काम करत होते. दांपत्यामध्ये झालेल्या वादातून पतीने पत्नीवर चारित्र्याचा संशय घेतला. या संशयाच्या पार्श्वभूमीवर त्याने अनितावर दगडाने गंभीर मारहाण केली. तिच्या डोक्यावर व चेहऱ्यावर झालेल्या जखमांमुळे ती



गंभीर जखमी झाली आणि रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच तिचा मृत्यू झाला.

या प्रकरणी बागायतदाराने दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी तातडीने कारवाई करत घटनास्थळी भेट दिली. श्रीवर्धन उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष आवटी यांनी घटनास्थळाची पाहणी केली. आरोपी पतीला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्यावर भारतीय दंड संहिता अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याची माहिती मिळते.

अशा प्रकारचा कृत्य हा अत्यंत गंभीर स्वरूपाचा असून भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ अंतर्गत खुनाचा गुन्हा ठरतो. वैयक्तिक संशय, कौटुंबिक वाद किंवा मानसिक तणाव यामुळे हिंसाचाराचा मार्ग स्वीकारणे हे कायद्याने गुन्हा असून त्यासाठी कठोर शिक्षा होऊ शकते.

ही घटना केवळ एक गुन्हेगारी प्रकरण नसून समाजात वाढत चाललेल्या संशय, असुरक्षितता आणि कौटुंबिक तणावाच्या समस्येकडेही लक्ष वेधणारी आहे. अशा घटनांना आळा घालण्यासाठी समुपदेशन, संवाद आणि कायद्याची जाणीव या गोष्टींचे महत्त्व अधोरेखित होते. पोलीस पुढील तपास करत असून घटनेमागील नेमकी कारणे शोधली जात आहेत.

## निवडक

### अष्टमी कोळीवाडा येथे आज उत्सव

**रोहा :** अष्टमी कोळीवाडा रोहा येथे श्री सातआसरा व शितळादेवी त्रैवार्षिक तारु उत्सव २०२६ आयोजित करण्यात आला आहे. ७ एप्रिल रोजी दिवसभर होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये सकाळी ८ वाजता देवीचा अभिषेक, सकाळी १० ते ११ वाजता सवासिन पूजन व देवीची ओटी भरण्याचा कार्यक्रम, दुपारी १२ ते ३ महाप्रसाद, सांय. ५ ते ८ देवींच्या तारूची भव्य मिरवणूक व विसर्जन आदीसह विविध धार्मिक, अध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दर्या किनारा मित्र मंडळ, ग्रामस्थ मंडळ, व महिला मंडळ अष्टमी कोळीवाडा हे परिश्रम घेत आहेत.

### डॉ. नागरगोजे यांना पुरस्कार

**खालापूर :** खोपोलीतील नामांकित आरोग्य अधिकारी तसेच भारतीय जनता पक्षाचे आरोग्य सेलचे डॉ बबनराव नागरगोजे यांना व्यसनमुक्तीसाठी विशेष कार्य केल्याबद्दल महात्मा गांधी राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल कर्जत खालापूरचे आमदार महेंद्र थोरवे आणि खोपोलीचे नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार, कौतुक आणि शाबासकीची थाप दिली. यावेळी सोनु शेलार मोहसीन शेख उपस्थित होते.




# एचपीव्ही लसीकरणाचा लाभ घ्यावा

## रोहा नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांचे आवाहन

**रोहा : प्रतिनिधी**

मंत्री आदिती तटकरे या लाडकी बहीण व अंगणवाडी सेविकासाठी चांगले काम चालु आहे. महीलांच्या निरोगी आरोग्यासाठी त्या नेहमीच अग्रेसर असतात. त्यांच्या प्रेरणेतुन एचपीव्ही वॅक्सिन ही लसीकरण मोहीम आम्ही हाती घेतली आहे. यासाठी ना.आदीती तटकरे यांनी निम्मा निधी दिला असुन निम्मा निधी नगरपरिषदेने उपलब्ध केले आहे.

ना.आदीती तटकरे यांनी आम्हाला सहकार्य केल्याबद्दल त्यांचे मनापासून आभार मानते. या लसीकरण मोहीमेसाठी रोहातील डॉक्टरांचे चांगले मार्गदर्शन मिळाले आहे. या मोहीमेत सगळे डोस मोफत दिले जाणार असुन एचपीव्ही वॅक्सिन लसीकरणाचा मुलींनी व महीलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन नगराध्यक्षा वनश्री शेडगे यांनी केले आहे.

रोहा अष्टमी नगर परिषद व दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महिला व बालकल्याण मंत्री कु.आदितीताई तटकरे यांच्या वाढदिवसानिमित महिलांकरिता "सर्व्हिकल कॅन्सर" जनजागृती मोहीम आणि "मोफत एचपीव्ही वॅक्सिन लसीकरण व आरोग्य तपासणी आदी उपक्रमाच्या शुभारंभ प्रसंगी जेष्ठ नागरिक सभागृह येथे नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी केले आहे.



यावेळी मुख्याधिकारी अजयकुमार एडके, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, डॉ पुजा भट, डॉ अपुर्वा क्षीरसागर, डॉ फरीद चिमावकर, गट नेते महेंद्र गुजर, सभापती महेश कोलाटकर, मयुर दिवेकर, निता हजारे, गौरी बारटक्के, रवी चाळके, पुर्वा मोहीते, स्नेहा आंबरे, संजना शिंदे, सुप्रिया जाधव, अफरीन रोगे, फराह पानसरे, प्रियंका धनावडे, रोशन चाफेकर, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, प्रेषीत बारटक्के, स्वप्नील धनावडे, डॉ अवनी शेडगे आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ पुजा भट यांनी भारतीय महीलांचे कॉन्सर मुळे मुत्यु होते त्याचे प्रमुख कारण सर्व्हिकल कॅन्सर"होय. HPV वॅक्सिन घेतल्यास धोका कमी होतो. या लसी मुळे कोणते ही दुष्परिणाम होत नाही. नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांच्या संकल्पनेतून ही लस मोफत उपलब्ध केली आहे. त्याचा फायदा महीलांनी घ्यावे असे आवाहन केले.

डॉ. फरीद चिमावकर यांनी या लसीबाबत लोकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे. यासाठी नगरपरिषदने पावले उचलुन महीलांना मोफत उपलब्ध करून दिले आहे.या लसीचा लाभ महीला व मुलींनी घ्यावे असे मी आवाहन करतो. डॉ अपुर्वा क्षीरसागर यांनी रोहा शहरात आरोग्यासाठी वनश्री यांनी पुढाकार घेतले आहे.महीलांनी याचा लाभ घेणे आवश्यक आहे.असे सांगितले

प्रास्ताविकात विद्या घोंडीदे यांनी लसी संदर्भात माहीती दिली.तर आभार मयुर दिवेकर यांनी मानले. यावेळी मोठ्या प्रमाणात महिला व नगरपरिषदेचे नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी, कर्मचारी व रोहेकर उपस्थित होते.

# माणगावात ८ एप्रिलला मोफत नेत्र तपासणी

**माणगाव : प्रतिनिधी**

शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगाव यांच्यातर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन बुधवार दि. ८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत जुने एसटी स्टँड माणगाव जवळ वृत्तपत्र विक्रेते नितीन मेथा यांच्या बाजूला असणाऱ्या महेंद्र पितांबर मेथा यांच्या प्रशस्त जागेत हॉलमध्ये करण्यात आले आहे.

शिबिराचा लाभ जास्तीत जास्त गरीब गरजू लोकांनी घ्यावा असे आवाहन माणगाव तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते तथा प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा यांनी केले आहे. माणगावात गेली तीन वर्षांहुन अधिक काळात ४५ वेळा माणगावात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्टतर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून नेत्ररुग्णांची तपासणी केली जात असून ज्यांना मोतीबिंदू आहे अशा नेत्ररुग्णांना पनवेल येथे आयोजकांच्याच गाडीत घेऊन जाऊन त्यांच्यावर मोफत शस्त्रक्रिया करून त्यांना पुन्हा माणगाव येथे आणले जाते.आतापर्यंत ३८०० हुन अधिक मोतीबिंदू असणाऱ्या रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. या शिबिराला दरमहिन्याला नेत्ररुग्णांचा मोठा असा प्रतिसाद लाभत आहे. जनसेवा हीच खरी ईश्वरसेवा समजून आपण हे सामाजिक उपक्रम राबवित असल्याचे आयोजक विजयशेठ मेथा यांनी प्रसार माध्यमांजवळ बोलताना सांगितले.

शिबीर यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी मेथा परिवारातर्फे विजयशेठ मेथा, मनीष मेथा, विधिता मेथा, सुप्रिया शिंदे यांच्यासह शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल टीम विशेष परिश्रम घेत आहेत.

# घोडा आणि ई-रिक्षा वादामुळे विकास खुंटला

## नगरसेवकांची खंत

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान नगरपरिषद निवडणुकीत शिवसेना-भाजप युतीला मिळालेल्या यशानंतर शहरामधील विविध विकासकामांना गती मिळावी यासाठी सत्ताधारी गट प्रेयत्नशील असताना स्थानिक घोडा आणि ई-रिक्षा संघटनांमधील वादामुळे प्रशासनाचा मोठा वेळ त्यात प्रश्नात खर्च होत असून विकासकामे रखडल्याची खंत नगरसेविकांनी स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांच्याकडे व्यक्त केली आहे.

स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांनी कर्जत येथे माथेरान मधील नगरसेवक,नगरसेविका आणि प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक घेतली. या बैठकीत नगरसेविका रिजवाना शेख, ऐश्वर्या शिंदे, लता ढेबे, सुरेखा साळुंखे,



कमल गायकवाड,अर्चना भिलारे त्याच बरोबर महिला आघाडीच्या प्रमुख संगीता जांभळे यांनी आपल्या समस्या मांडल्या. प्रभागांतील रस्ते व इतर महत्त्वाची कामे प्रलंबित असल्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालय यांच्या आदेशानुसार क्ले-पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांचे काम पूर्ण करणे आवश्यक आहे.विशेषतः महात्मा गांधी रस्त्यापासून शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंतचे काम पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आलेआहेत.मात्र कस्तुरबा रोडवरील निकृष्ट कामामुळे मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून नागरिक जखमी होण्याच्या घटना वाढल्या आहेत.

नगरपालिकेकडून तुटलेले क्ले-पेव्हर ब्लॉक बदलण्याचे काम सुरू असताना काही घोडेधारकांकडून अडथळे निर्माण होत असल्याचा आरोप नगरसेविकांनी केला. २०१४ मध्ये मातीची धूप रोखण्यासाठी आणि धूळमुक्त रस्ते करण्यासाठी क्ले-पेव्हर ब्लॉक बसवण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

# ज्येष्ठ नागरिकांना दिलासा देणे आपले कर्तव्य -सरफळे

**रोहा : प्रतिनिधी**

आपल्या ज्येष्ठ नागरिकांचे सामाजिक काम अत्यंत उत्तम चालले आहे. आपण निरनिराळे आवश्यक स्तुत्य उपक्रम राबवत आहोत. सदस्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. वाढत्या वयामुळे ज्येष्ठ नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यांना मदत करून दिलासा देणे हे आपले आद्य कर्तव्य आहे, असे रोहे ज्येष्ठ संघटनेचे अध्यक्ष श्री.पी.बी.सरफळे यांनी ज्येष्ठ नागरिक सभागृहात आयोजित केलेल्या सभेत बोलताना सांगितले.

यावेळी अध्यक्ष पी. बी. सरफळे रावसाहेब यांच्या सह



उपाध्यक्ष एस.एन.गायकवाड, सचिव सुरेश मोरे, खजिनदार प्रकाश पाटील, महंमदशेठ डबीर, शरद गुडेकर, अशोक जोशी, दत्तात्रेय तवटे, अनुराधा धुमाळ, शैलजा सुभाष देसाई, नंदकुमार भादेकर व शेखर गुंड असे सुमारे १०० सदस्य उपस्थित होते.

सरफळे यांनी मार्गदर्शन करताना आपली संघटना ज्येष्ठ नागरिकांचे वाढदिवस साजरे करणे त्यांचे श्रीफळ व गुलाब पुष्प प्रदान करून सर्वा समोर अभिष्टचिंतनाच्या शुभेच्छा दिल्यामुळे त्यांना

समाधान मिळते. इतर संघटनेकडून ज्येष्ठ नागरिकांना चालणे सुलभ व्हावे म्हणुन स्टिक व आरोग्यासाठी मोफत उपचार आरोग्य तपासणी केली जाते. त्यामुळे खूप समाधान मिळते. मी व आपले पदाधिकारी स्वतः स्टेटबँक इंडिया व बँक ऑफ इंडिया या बँकेत जाऊन संबंधित बँकाच्या मॅनेजर यांना ज्येष्ठ नागरिकांना सहकार्याबद्दल बोललो. त्यांनी ज्येष्ठ नागरिकांना सौजन्यांची वागणूक देऊन बँकेत त्यांचा आदर करून त्वरित कामे करण्याचे आश्वासन दिले. शासकीय कामे, प्रवास आणि इतर आवश्यक कामे संघटनेचे मार्फत अध्यक्ष पी. बी. सरफळे यांनी करण्याचे सभेत सांगितले. ज्येष्ठ नागरिक एकत्र जमतात विचाराची देवाण- घेवाण समस्या मांडतात त्या सोडविल्या जातात त्यामुळे त्यांना अधिक दिलासा मिळतो.




# पोलादपूर पोलिसांनी पाहिला 'धुरंधर पार्ट-२'

**पोलादपूर : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक (भारतीय पोलिस सेवा) आँचल दलाल यांच्या आदेशावरून पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे यांच्यासह सर्व पोलीस कर्मचारी वृंदाने महाड येथे चित्रपट गृहामध्ये रविवारी धुरंधर पार्ट-२ सिनेमा पाहिला.

राजकीय प्रभावाने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी जगतासह पोलिसांनी दिलेल्या कायदा व सुव्यवस्थेच्या माध्यमातून लढाईचे जोश पूर्ण चित्रण असलेल्या धुरंधर पार्ट २ या बहुचर्चित यशस्वी चित्रपटातून पोलादपूर पोलिसांनी प्रेरणा घेण्यासंदर्भात रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक भारतीय पोलीस सेवा आँचल दलाल यांनी विशेष परवानगी दिली.

यामुळे पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे, उपनिरीक्षक मंगेश मुंडे, उपनिरीक्षक सतीश पवार, ६ महिला पोलीस तसेच सुमारे २५ हून अधिक पोलीस कर्मचारी हे महाड येथील पी.जी.सिटी चित्रपटगृहामध्ये धुरंधर पार्ट २ हा सिनेमा पाहण्यासाठी उपस्थित राहिले.

# कॉल बेसिसवर भाडोत्री वाहन सेवा पुरवठा करण्यासाठी आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (SMART) प्रकल्पांतर्गत जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांना कार्यालयीन कामकाजाकरीता कॉल बेसिसवर भाडोत्री वाहन सेवा पुरवठा करण्याकरीता प्रमुख, जिल्हा अंमलबजावणी कक्ष स्मार्ट, रायगड यांच्या कार्यालयात विहित प्रपत्रात दरपत्रक कार्यालयीन वेळेत ऑफलाईन पद्धतीने १६ एप्रिल २०२६ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत सादर करावीत, असे आवाहन प्रमुख, जिल्हा अंमलबजावणी कक्ष स्मार्ट तथा प्रकल्प संचालक आत्मा रायगड वंदना शिंदे यांनी केले आहे.

पुरवठादारांना पुरवठ्याच्या अटी व शर्तीचे दरपत्रक, मागणीपत्र तसेच दरपत्रकाचा विहित नमुना प्रपत्र विनामूल्य या कार्यालयात तसेच स्मार्ट प्रकल्पाच्या अधिकृत वेबसाईटवर (https://www.smart-mh.org/) उपलब्ध करून दिले जातील. पात्र पुरवठादार, कंपन्यांनी जास्तीत जास्त सहभाग घेऊन दरपत्रक, कोटेशन सादर करावीत.

# ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिर

**महाड : प्रतिनिधी**

ज्येष्ठ नागरिक संघ महाड व निर्मल सुधा नरसिंग होमच्या नेत्र तज्ञ डॉक्टर पूनम कोल्हे यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफतनेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ नागरिक संघाचे साचिव डॉक्टर चंद्रकांत दोशी, खजिनदार भारत मेहता, सल्लागार श्री अनंत टमके,श्री.राम वडके, कार्यकारिणी सदस्य श्रीकांत



सहस्रबुद्धे, अनंत सावंत यांच्या मार्दर्शनाखाली पार पडले.

तज्ञ डॉक्टर पूनम कोल्हे यांनी प्रथम सर्व उपस्थित ज्येष्ठ नागरिकांना डोळ्याविषयी व्यवस्थित माहिती सांगितली त्यानंतर केवळ नेत्र तपासणीचं नव्हे तर त्या अनुषंगाने येणाऱ्या तक्रारी, डोळ्यांचे विविध आजार, विविध संसर्गजन्य रोग, चाचण्या, अद्यावत यंत्रणा, औषधे, वेळोवेळी घ्यावयाची काळजी, चष्मे कसे घालावे , कोणत्याप्रकारचे घालावे, याबद्दल केलेले सप्रात्यक्षिक मार्गदर्शन, विवेचन खूपच मोलाचे ठरले.

यावेळी ७७ जेष्ठ नागरिकांचे काळजी पूर्वक डोळे तपासण्यात आले. नेत्र तज्ञ डॉक्टर पूनम कोल्हे आणि त्यांच्या सहकारी तेजश्री शिर्के, सोनल जाधव, सलामी पवार, उज्वला ताम्हणकर व सावंत ऑप्टिकल चे कर्मचारी यांच्या सहकार्याने हे मोफत नेत्र तपासणी शिबिर पार पडले.

ज्येष्ठ नागरिक संघ महाडचे खजिनदार हे भारत मेहता यांनी शेवटी नेत्र तज्ञ डॉ पूनम कोल्हे व त्यांचे सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले.

# आरसीबीची चेन्नईवर मात!



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

टीम डेविडच्या धमाकेदार खेळीनंतर भुवनेश्वर कुमारच्या भेदक माऱ्याच्या जोरावर एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर रंगलेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या संघाने ४३ धावांनी दिमाखदार विजय नोंदवला. यासह चेन्नई सुपर किंग्सच्या संघाच्या पराभवाची हॅट्ट्रिक झाली.

पहिल्यांदा फलंदाजी करताना बंगळुरू संघाने २५० धावा केल्या होत्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना चेन्नई संघ २०७ धावांवर ऑल आउट झाला.

चेन्नईचा कर्णधार ऋतुराज गायकवाड याने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. विराट कोहलीच्या रूपात अवघ्या ३७ धावांवर त्यांनी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुला पहिला धक्का दिला. तो १८ चेंडूत २८ धावा करून स्वस्तात माघारी फिरला, पण त्यानंतर प्रत्येकाने उपयुक्त धावा करत संघाचा धावफलक हलता ठेवला. फिल सॉल्टने ३० चेंडूत तीन चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ४६ धावांची खेळी केली. देवदत पडिक्कल याने २९ चेंडूत अर्धशतक झळकावले. कर्णधार रजत पाटीदार याने १९ चेंडूत दोन चौकार व सहा षटकारांच्या मदतीने नाबाद ४८ धावा आणि टीम डेविड याने २५ चेंडूत तीन चौकार आणि आठ षटकारांच्या मदतीने केलेल्या ७० धावांच्या खेळीच्या जोरावर बंगळुरूच्या संघाने निर्धारित २० षटकात तीन विकेट्सच्या मोबदल्यात २५० धावा केल्या होत्या. चेन्नईकडून अंशुल कंबोज, जेमी ओव्हर्टन आणि शिवम दुबे यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

विक्रमी २५१ धावांचा पाठलाग करताना संजू सॅमसन ९ (५), कर्णधार ऋतुराज गायकवाड ७ (३) आणि आयुष म्हात्रे १ (३) हे चेन्नईच्या आघाडी फळीतील फलंदाज सपशेल अपयशी ठरले. सरफराज खान याने २५ चेंडूत दमदार अर्धशतक झळकावले, पण तो शेवटपर्यंत टिकला नाही. प्रशांत वीरने २९ चेंडूत ४३ धावांच्या खेळीसह लक्षवेधून घेणारी खेळी केली, मात्र ती संघाला विजय मिळवून देण्याइतकी भारी ठरली नाही. याशिवाय जेमी ओव्हर्टन याने १६ चेंडूत केलेल्या ३७ धावांच्या जोरावर चेन्नईच्या संघाने २०७ धावांपर्यंत मजल मारली.

आरसीबीच्या भुवनेश्वर कुमारने घेतलेल्या सर्वाधिक तीन विकेट्सशिवाय जेकब डफी, अभिनंदन सिंग, क्रुणाल पांड्या यांनी प्रत्येकी दोन, तर सूयश शर्माने एक विकेट आपल्या खात्यात जमा केली.




## बेलापूरमध्ये क्रिकेट प्रीमियर लीग रंगली

**नवी मुंबई : बातमीदार**

शहरातील गावपणाची एकजूट जपत क्रिकेट स्पर्धेच्या माध्येमातून एकात्मतेची सांगड घालत आयोजित करण्यात आलेल्या प्रभाग क्रमांक २७ प्रीमियर लीग या क्रिकेट स्पर्धेचा भव्य समारोप रविवार (दि. ५) उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सलग तीन दिवस सुरू असलेल्या या स्पर्धेत एकूण १२ संघांमध्ये बेलापूर येथील ४० प्लस मैदानात सामने रंगले.

कुंदन म्हात्रे यांच्या संकल्पनेतून या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत बेलापूरगाव, दिवाळे कोळीवाडा, शहाबाज, फणसपाडा, आग्रोळी, एकता विहार, आयकर कॉलनी, टाटा नगर, पारसिक हिल आणि किल्ले गावठाण या परिसरातील स्थानिक संघ मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. अखेरच्या सामन्यात समायरा फायटर्स या संघावर मात करत बाजी मारत स्पर्श वॉरिअर्स संघ विजेतेपदाचा मानकरी ठरला.

विजेता व उपविजेत्या संघासह मालिकावीर देवेश कोळी, उत्कृष्ट फलंदाज नवीन कातकरी, उत्कृष्ट गोलंदाज सचिन शर्मा, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक स्वप्नील ठाकूर, सामनावीर भावेश गझने यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. अखेरचा सामना पाहण्यासाठी नवी मुंबई परिसरातील क्रिकेटप्रेमींनी गर्दी केली होती.

## विराट कोहलीने मोडला रोहित शर्माचा विक्रम



**मुंबई : प्रतिनिधी**


बंगळुरुतील एम चिन्नास्वामी स्टेडियमवर पार पडलेल्या चेन्नई सुपर किंग्जविरुद्धच्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा स्टार फलंदाज विराट कोहली १८ चेंडूत २८ धावांची छोटेखानी खेळी करून माघारी परतला. लवकर बाद होऊनही विराटने हिटमॅन रोहित शर्माचा मोठा रेकॉर्ड मोडून काढला आहे.

विराट कोहली पहिल्या हंगामापासून या स्पर्धेचा भाग आहे. त्याने या स्पर्धेतील सर्व संघांविरुद्ध खेळताना धावांचा पाऊस पाडला आहे. आता आयपीएल स्पर्धेतील एकाच संघाविरुद्ध सर्वाधिक धावा करण्याच्या विक्रमात विराटने रोहित शर्माला मागे टाकले आहे.

याआधी हा रेकॉर्ड विराट कोहलीच्याच नावे होता, पण रोहितने कोलकाता नाईट रायडर्स संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात अर्धशतकी खेळी करून हा रेकॉर्ड मोडला होता. आता पुन्हा एकदा विराट अव्वल स्थानी पोहचला आहे.

विराटने चेन्नई सुपर किंग्ज संघाविरुद्ध खेळताना ११८८ धावा केल्या आहेत. या यादीत रोहित शर्मा दुसऱ्या स्थानी आहे. रोहितच्या नावे ११६१ धावा करण्याची नोंद आहे. रोहितने हा कारनामा कोलकाता नाईट रायडर्स संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात केलेला आहे.

## भुवनेश्वर कुमारने इतिहास रचला!



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल इतिहासात भुवनेश्वर कुमारने आपले नाव सोनेरी अक्षरात लिहिले आहे. रॉयल चॅलेंजर्स बंळुरूच्या या गोलंदाजाने चेन्नई सुपर किंग्सविरुद्धच्या सामन्यात एक विकेट घेत मोठा इतिहास घडवला आहे.


आरसीबीने दिलेल्या २५१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भुवनेश्वरच्या दुसऱ्याच चेंडूवर मोठ्या धावसंख्येचे लक्ष असल्यामुळे आयुष म्हात्रेने मोठा फटका खेळला, मात्र तो झेलबाद झाला. यासह मोठ्या विक्रमाच्या उंबरठ्यावर असलेल्या भुवनेश्वरने आयपीएल इतिहासातील आपल्या २०० विकेट्स पूर्ण केल्या. भुवी हा आयपीएलच्या इतिहासात स्पर्धेत २०० विकेट्स घेणारा पहिला वेगवान गोलंदाज ठरला आहे. यापूर्वी इतर कोणत्याही वेगवान गोलंदाजाने ही कामगिरी केलेली नाही. भुवनेश्वर कुमार हा आयपीएलमधील दुसरा सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज असून पहिल्या स्थानी फिरकीपटू युझवेंद्र चहल आहे. चहलने या स्पर्धेत आतापर्यंत १७६ सामन्यांमध्ये २२४ विकेट्स घेतल्या आहेत.

## हैदराबादला नमवून लखनऊची विजयी सलामी

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

कर्णधार ऋषभ पंतच्या नाबाद अर्धशतकाच्या जोरावर लखनऊ सुपर जाएंट्सच्या संघाने सनरायझर्स हैदराबादच्या संघाला त्यांच्या घरच्या मैदानात पाच विकेट्सनी पराभूत करत यंदाच्या हंगामातील पहिल्या विजयाची नोंद केली.

नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करताना मोहम्मद शमीसह प्रिन्स यादव आणि आवेश खान यांच्या भेदक माऱ्याच्या जोरावर लखनऊच्या संघाने तगडी फलंदाजी असलेल्या सनरायझर्स हैदराबादच्या संघाला १५६ धावांवर रोखले होते. या धावांचा पाठलाग करताना एडन मार्करम याने २७ चेंडूत ४५ धावांची दमदार खेळी केल्यावर कर्णधार पंत याने नाबाद ६८ धावांची खेळी केली. त्यानेच खणखणीत चौकारासह संघाला पहिला विजय मिळवून दिला.



सनरायझर्स हैदराबादच्या संघाने दिलेल्या १५७ धावांचा पाठलाग करताना अवघ्या ३७ धावांवर मिचेल मार्शच्या रुपात इशान मलिंगा याने लखनऊच्या संघाला पहिला धक्का दिला. पहिली विकेट स्वस्तात गमावल्यावर मार्करम आणि पंत जोडी जमली. या दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी २८ चेंडूत ४० धावांची भागीदारी रचली. अर्धशतकाच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या मार्रमच्या खळीला शिवांग कुमार याने ४५ धावांवर ब्रेक लावला. एका बाजूने विकेट पडत असताना पंतने सामन्याची सूत्रे आपल्या हाती घेतली. शेवटपर्यंत मैदानात थांबत लखनौच्या पहिल्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

अखेरच्या षटकात नऊ धावांची गरज असताना ईशान किशन याने जयदेव उनाटकट याच्याकडे चेंडू सोपवला. या षटकात पंतने तीन चौकार मारले. माफक धावसंख्येचा बचाव करताना सनरायझर्स हैदराबादच्या संघाकडून हर्ष दुबे याने चार षटकात फक्त १८ धावा खर्च करत सर्वाधिक दोन विकेट्स घेतल्या. त्याच्याशिवाय इशान मलिंग आणि शिवांग कुमार यांनी प्रत्येकी एक एक विकेट घेतली.

तत्पूर्वी पहिल्यांदा फलंदाजी करताना आघाडीच्या फलंदाजांच्या फ्लॉप शोनंतर नितीश कुमार रेड्डीने ३३ चेंडूत तीन चौकार आणि पाच षटकारांच्या मदतीने ५६ धावांची उपयुक्त खेळी आणि क्लासेन याने ४१ चेंडूचा सामना करताना पाच चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने केलेल्या ६२ धावांच्या जोरावर सनरायझर्स हैदाराबादचा संघाने निर्धारित २० षटकात ९ बाद १५६ धावा केल्या होत्या.


लखनऊ संघाकडून गोलंदाजीत मोहम्मद शमी हा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने चार षटकांत फक्त नऊ धावा खर्च करत दोन विकेट्स घेतल्या. याशिवाय प्रिन्स यादव आणि आवेश खान यांनी प्रत्येकी दोन, तर दिग्वेश राठी आणि मणिमरन सिद्धार्थ यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

## सर्फराझ खानचा दुर्मिळ विक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

यंदाच्या आयपीएलची सुरुवात चेन्नई सुपर किंग्स संघासाठी निराशाजनक झाली आहे. सीएसकेला सलग तीन पराभवांना सामोरे जावे लागले, पण यादरम्यान सर्फराझ खानची तिन्ही सामन्यांमधील कामगिरी संघासाठी दिलासादायक ठरली. सर्फराझने आरसीबीविरूद्ध सामन्यात चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करत अर्धशतक झळकावले. यासह त्याने आयपीएल इतिहासात मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने प्रथम फलंदाजी करताना २५० धावांचा डोंगर उभारला. यासह प्रत्युत्तरात चेन्नई सुपर किंग्सचा संघ १९.४ षटकांत २०७ धावांवर सर्वबाद झाला. चेन्नईने हा सामना गमावला असला तरी संघाच्या फलंदाजी विभागाने २०० अधिक धावांचा डोंगर उभारत आपली चमकदेखील दाखवली. याशिवाय सर्फराझ खानने पॉवरप्लेमध्ये चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करताना अर्धशतक झळकावणारा पहिला फलंदाज ठरत आयपीएलमध्ये इतिहास घडवला.



धावांचा पाठलाग करताना सीएसकेची सुरूवात खूपच खराब झाली. त्यांचे पहिले तीन फलंदाज, संजू सॅमसन, ऋतुराज गायकवाड आणि आयुष म्हात्रे, यांनी मिळून केवळ १७ धावा केल्या. त्यानंतर चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला उतरत सर्फराझने संघाचा डाव सावरला आणि २००पेक्षा जास्त स्ट्राइक रेटने अर्धशतक झळकावले. सीएसकेने सर्फराझच्या खेळीमुळे अवघ्या १९ चेंडूंमध्ये ३ बाद ३० धावांवरून ३ बाद ७७ धावा अशी मजल मारली. त्याच्या या खेळीने एक मोठा आयपीएल विक्रमही रचला. आयपीएलमध्ये चौथ्या किंवा त्यापेक्षा खालच्या क्रमांकावर फलंदाजी करताना पहिल्या सहा षटकांत अर्धशतक झळकावणारा तो पहिला फलंदाज ठरला आहे.

## विजयानंतर लखनऊचे मालक संजीव गोएंका भावूक

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

लखनऊ सुपर जायंट्सच्या विजयापेक्षा संघाचे मालक संजीव गोयंका यांचा भावनिक व्हिडीओ सध्या चर्चेत आहे. सनराइजर्स हैदराबादविरुद्धच्या सामन्यानंतर गोयंका यांच्या डोळ्यांत अश्रू तरळलेले दिसले आणि ते कॅमेऱ्यात कैद झाले. साधारणपणे कठोर आणि स्पष्ट भूमिका घेणारे गोयंका यांचे हे वेगळे भावनिक रूप पाहून चाहत्यांनाही आश्चर्याचा धक्का बसला.



आयपीएल २०२६मध्ये लखनऊ सुपर जायंट्ससाठी हा पहिलाच विजय आहे. पहिल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सकडून पराभव पत्करल्यानंतर संघावर दबाव होता. त्यामुळे हैदराबादमध्ये मिळालेला हा विजय संघासाठी अत्यंत महत्त्वाचा होता. याच विजयाच्या आनंदात गोयंका भावूक झाल्याचे दिसून आले.

सामन्यादरम्यान गोयंका प्रार्थना करताना दिसले आणि शेवटच्या क्षणी सामना जिंकल्यानंतर त्यांच्या भावना अनावर झाल्या. ते डोळ्यातील अश्रू पुसताना दिसले. त्यांच्या या भावनिक प्रतिक्रियेमुळे सोशल मीडियावर मोठी चर्चा रंगली असून अनेकांनी त्यांच्या टीमप्रती असलेल्या जिव्हाळ्याचे कौतुक केले.

## पायल नागचा वर्ल्ड पॅरा आर्चरी सीरिजमध्ये 'सुवर्ण'वेध

**बँकॉक : वृत्तसंस्था**

जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वास असेल तर कोणतीही अडचण मोठी नसते याचे ताजे उदाहरण म्हणजे १८ वर्षीय पायल नाग. दोन्ही हात आणि पाय गमावूनही पायल नागने बँकॉक येथे झालेल्या वर्ल्ड पॅरा आर्चरी सिरीज स्पर्धेत सुवर्णपदकाला गवसणी घातली. विशेष म्हणजे, पायलने तिचे प्रेरणास्थान असलेल्या विद्यमान वर्ल्ड चॅम्पियन शीतल देवी हिला १३९-१३६ अशा फरकाने पराभूत केले.

पायल नागची यशोगाथा जितकी प्रेरणादायी आहे, तितकीच वेदनादायक आहे. पायल तिसरीत शिकत असताना आपल्या भावासोबत



एका बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या पाचव्या मजल्यावर खेळत होती. त्या वेळी ती चुकून ती वीजतारांच्या संपर्कात आली. ११,००० व्होल्टच्या विजेचा जोरदार धक्का बसल्यामुळे तिला आपले दोन्ही हात आणि दोन्ही पाय गमवावे लागले.

पायलचे वडील विजय कुमार नाग, जे ओडिशातील बेलांगीर जिल्ह्यात मजुरी करतात, त्यांनी आणि आपल्या मुलीला जगवण्याचा निर्णय घेतला. पायलला पार्वती गिरी बाल निकेतन अनाथालयात ठेवण्यात आले. याच काळात तिच्या आयुष्यात खेळ आला आणि तिने पॅरा आर्चरीकडे वाटचाल सुरू केली. २०२३-२४मध्ये तिने कटरा येथील माता वैष्णो देवी श्राइन बोर्ड स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे प्रशिक्षण घेतले. तिथेच तिने शीतल देवीसोबत सराव केला.

२०२५मध्ये पायल नागने राष्ट्रीय स्तरावर पदार्पण केले, त्यानंतर सातत्याने चांगली कामगिरी केली. आता वर्ल्ड पॅरा आर्चरी सिरीजमध्ये सुवर्णपदक जिंकून तिने जागतिक स्तरावर मोठे यश मिळवले आहे. तिची ही कामगिरी प्रेरणादायी ठरत आहे.

## डिव्हिलियर्सच्या विक्रमाशी टीम डेविडची बरोबरी



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

बंगळुरुच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर रंगलेल्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्सला एका नो बॉलची मोठी किंमत मोजावी लागली. १८व्या षटकातील पाचव्या चेंडूवर अंशुल कंबोज याने आक्रमक फलंदाजी करण्याच्या मूडमध्ये असलेल्या टीम डेविड याला परफेक्ट यॉर्करव बोल्ड केले, पण ओव्हर स्टेप नो बॉलमुळे त्याला जीवनदान मिळाले अन् तो पेटून उठला.

चेन्नईविरुद्धच्या सामन्यात टीम डेविडने तीन चौकार आणि ८ षटकारांच्या मदतीने फक्त २५ चेंडूत ७० धावांची नाबाद खेळी केली. यातील ४२ धावा या त्याने अखेरच्या १० चेंडूत काढल्या. आठ षटकारांसह त्याने आयपीएलमध्ये पाचव्या क्रमांकावर फलंदाजी करताना एका डावात सर्वाधिक षटकार मारणाऱ्या एबी डिव्हिलियर्सची बरोबरी केली. २०१४मध्ये डिव्हिलियर्सने सनरायझर्स हैदराबादच्या संघाविरुद्ध आठ षटकार मारले होते.

या यादीत युवराज सिंग अव्वलस्थानावर आहे. पाचव्या क्रमांकावर फलंदाजी करताना २०१४च्या हंगामात युवीने दिल्लीच्या संघाविरुद्ध नऊ षटकार मारले होते.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com